14 Nov 2026_Layout 1 11/14/2026 12:32 AM Page 1

नोव्हेंबर/November
शनिवार/saturday
दि.१४/Dt: 14
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक २४/Issue 24 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

गेवराईत महावितरणचा कोट्यवधींचा विद्युत घोटाळा!

शासकीय मालमत्तेवर दिवसाढवळ्या दरोडा! विनापरवाना २५ खांब अन् २ डीपी हलवले;तत्कालीन अधिकारी अर्थपूर्ण झोपेत?

बड्या अधिकाऱ्यांना वाचवून केवळ प्याद्यांवर कारवाईचा डाव? शाम मोरेंना सहआरोपी करा;गेवराईकरांचा संताप!

पोलिसांचा फास आवळताच दप्तरात फेरफार करण्याचा डाव? शाम मोरेंच्या मुसक्या आवळण्याची जनतेची मागणी!

गेवराई/जगमित्र न्यूज

महावितरणच्या नियम आणि कायद्यांना थेट केराची टोपली दाखवत गेवराई तालुक्यातील देवपिंपरी शिवारात तब्बल १८ उच्चदाब विद्युत खांब, २ रोहित्रे (डीपी) आणि ७ पोल परस्पर उखडून दुसरीकडे हलवल्याचा महाघोटाळा उघडकीस आला आहे. याप्रकरणी सेल रे पॉवर लिमिटेड कंपनी आणि अमोल राठोड यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला असला, तरी या संपूर्ण काळ्या कारनाम्याला तत्कालीन उपकार्यकारी अभियंता शाम मोरे यांचा आशीर्वाद होता का, असा संतप्त सवाल आता गेवराईकर विचारत आहेत. बड्या धेंडांना वाचवून केवळ प्याद्यांवर कारवाई करण्याचा डाव आखला जात असल्याचा आरोप होत असून, शाम मोरे यांना या गुन्ह्यात **(पान २ वर)**



सेल रेच्या काळ्या कारनाम्याला तत्कालीन अभियंता शाम मोरेंचे अभय!

शाम मोरे तत्कालीन उपकार्यकारी अभियंता

मागील तारखेची परवानगी मिळवण्याचा केविलवाणा खटाटोप!

सूत्रांकडून मिळालेल्या खळबळजनक माहितीनुसार, पोलिसांचा फास आवळताच आता आरोपी आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या अदृश्य हातांनी सरकारी कार्यालयात जोरदार फिल्डिंग लावली आहे. हे प्रकरण दडपण्यासाठी मागील तारखेची स्थलांतर परवानगी मिळवून प्रशासकीय दप्तरात फेरफार करण्याचा डाव आखला जात असल्याची जोरदार चर्चा आहे. महावितरणचे वरिष्ठ अधिकारी या दबावाला बळी पडणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महावितरणचे मूळ साहित्य भंगारात विकून खिसे गरम केले?

हा केवळ विनापरवाना स्थलांतराचा विषय नसून शासकीय मालमत्तेच्या चोरीचा आणि कोट्यवधींच्या अपहाराचा गंभीर गुन्हा आहे. मूळ उच्चदाब वाहिनीचे १८ खांब, रोहित्रे आणि महागड्या विद्युत तारा काढल्यानंतर त्या महावितरणच्या अधिकृत स्टोअरमध्ये जमा झाल्या की गुत्तेदाराने परस्पर भंगारात विकून टाकल्या? या शासकीय साहित्याचा नेमका हिशोब कोणाकडे आहे? याचा सखोल तपास पोलिसांनी करणे गरजेचे आहे.

केवळ प्यादी नकोत, बड्या अधिकाऱ्याच्या मुसक्या आवळा!

भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३६, १३८ आणि १४६ अन्वये गुन्हा दाखल झाला असला, तरी केवळ कंपनी आणि ठेकेदारावर कारवाई करून चालणार नाही. शासकीय मालमत्तेची लूट होत असताना कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर करणाऱ्या तत्कालीन उपकार्यकारी अभियंता शाम मोरे यांना या गुन्ह्यात सहआरोपी करण्यात यावे, अशी आक्रमक मागणी नागरिकांमधून होत आहे. आता गेवराई पोलीस या बड्या अधिकाऱ्याच्या मुसक्या आवळणार की हे प्रकरण नेहमीप्रमाणे फाईलमध्ये बंद होणार, याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

नागेवाडीतील अवैध वृक्षतोड प्रकरणी गुन्हे दाखल करण्याची पर्यावरण मंत्र्यांकडे मागणी

पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे यांचे तात्काळ चौकशीचे आदेश

जालना/मकरंद जहागीरदार :- जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नागेवाडी गावामध्ये प्लॉटिंग व्यवसायासाठी जुने आणि मोठमोठ्या वडाच्या-पिंपळाच्या ऐतिहासिक वृक्षांची जेसीबी यंत्रांद्वारे कत्तल करण्यात आल्याची तक्रार अंबड येथील पर्यावरणप्रेमी नागरिक भास्करराव रामभाऊ खरात यांनी जालन्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरणमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांची मुंबईत थेट भेट घेऊन गुरुवारी (ता. १२) केली. आठवडाभरात कारवाई न झाल्यास राष्ट्रीय हरित लवादाकडे याचिका दाखल करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

दरम्यान, वन खात्याच्या जालन्यातील अधिकाऱ्यांनी प्रकरणाची तात्काळ चौकशी सुरू केल्याची माहिती सहाय्यक **(पान २ वर)**



शेतकरी कर्जाच्या तक्रारीसाठी स्वतंत्र कर्मचाऱ्याची नेमणूक करा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड (जिमाका) :- जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप, कर्जमाफी आणि दुष्काळी परिस्थितीत होणारी सक्तीची कर्जवसुली यांसह इतर तांत्रिक अडचणींपासून दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तरी तक्रारदार शेतकऱ्यांना प्रशासनाकडून तात्काळ प्रतिसाद मिळावा आणि त्यांच्या तक्रारींचे विहित वेळेत निवारण व्हावे, यासाठी एका स्वतंत्र कर्मचाऱ्याची नेमणूक करावी, असे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी



संबंधितांना दिले.

शेतकऱ्यांना पिक कर्ज वाटप, कर्जमाफी, दुष्काळात सक्तीची वसुली व इतर अडचणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीस अपर जिल्हादंडाधिकारी सतिश सोनी, जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार, अग्रणी बँक अधिकारी सचिन गांगुर्डे, सहकार अधिकारी सिध्देश्वर सांगुळे, ऋषिकेश कातळे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

पीक कर्ज वाटप, कर्जमाफी योजना आणि अवैध सावकारीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या स्वरूपाचे बारकाईने अवलोकन केले. जिल्ह्यात **(पान २ वर)**

समृद्धी महामार्गावर भीषण अपघातांची मालिका!

सिमेंट मिक्सर ट्रक पलटी;अपघात पाहण्यासाठी थांबलेल्या २५ हून अधिक कार एकमेकांवर आदळल्या सुदैवाने जीवितहानी टळली;अनेक वाहनांचे मोठे नुकसान,अपघातस्थळी वाहतुकीचा खोळंबा



सिंदखेड राजा/दिपक नागरे

समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका घडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हिवरखेड पूर्णा ते तढेगाव दरम्यान चॅनल क्रमांक ३२१.९०० वरील पुलावर सिमेंट मिक्सिंग ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक बॅरिगेट्सला धडकून पलटी झाला. या अपघातानंतर घटनास्थळी निर्माण झालेल्या गोंधळात मागून येणाऱ्या वाहनांची एकमेकांना धडक बसली. विशेष म्हणजे, अपघात पाहण्यासाठी थांबलेल्या कारच्या रांगेला मागून आलेल्या एका भरधाव ट्रकने जोरदार धडक दिल्याने तब्बल २५ हून अधिक कारचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. सुदैवाने या घटनांमध्ये कोणालाही गंभीर दुखापत झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला.

प्राप्त माहितीनुसार, इमरान अन्सारी मिराज अन्सारी (वय २४, रा. पनवेल) हा चालक अमरावती येथून मुंबईच्या दिशेने सिमेंट मिक्सिंग ट्रक घेऊन जात होता. शुक्रवारी सकाळी सुमारे ६.३० वाजेच्या सुमारास हिवरखेड पूर्णा ते तढेगावदरम्यान समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक ३२१.९०० वरील पुलावर अचानक ट्रकवरील त्याचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक महामार्गाच्या बाजूला असलेल्या बॅरिगेट्सला जोरदार धडक देऊन रस्त्यावर पलटी झाला. या घटनेने महामार्गावरील वाहतुकीत एकच खळबळ उडाली.

अपघात पाहण्याच्या उत्सुकतेत कारच्या लांबच लांब रांगा!

सिमेंट मिक्सिंग ट्रक पलटी झाल्यानंतर त्याच मार्गाने मागून येणाऱ्या काही कारची ट्रकला धडक बसली. सोनोशी येथील गजानन नागरे हे पुणे येथे जात असतांना, गाडी थांबवून ट्रकचालकास **(पान २ वर)**

नगरपंचायत पालममधील कथित भ्रष्टाचारावर आ.रत्नाकर गुट्टे काय भूमिका घेणार?

पालम/अनिस खुरेशी

पालम शहरातील नगरपंचायत मधील विकासकामांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा आता चर्चेचा विषय ठरत आहे. आमदार रत्नाकरराव गुट्टे साहेब यांच्या नेतृत्वाखालील नगरपंचायतीच्या कारभारातील या गंभीर आरोपांवर ते नेमकी काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण पालम-



पूर्णा-गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याचे आरोप आहेत. दोन वेळा चौकशी झाल्यानंतर तत्कालीन मुख्याधिकारी संतोषजी लोमटे यांच्यासह सात जणांवर दोषारोप निश्चित झाल्याचा दावा करण्यात येत असून, कारवाईसाठी अहवाल अपर सचिवांकडे **(पान २ वर)**

परळीतून ८१ वर्षीय वृद्ध बेपत्ता; अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाची फिर्याद दाखल!

दोन दिवसांपासून प्रभाकर नागरगोजे यांचा शोध सुरु; मुलाच्या तक्रारीवरुन परळी पोलिसांत गुन्हा दाखल



परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- परळी शहरातील माणिकनगर परिसरातून ८१ वर्षीय वृद्ध व्यक्ती बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणाला आता अपहरणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रभाकर श्रीपतराव नागरगोजे (वय ८१, रा. माणिकनगर, परळी वैजनाथ) हे ११ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास घराबाहेर गेले होते. मात्र, त्यानंतर ते घरी परतलेच नसल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली आहे. याप्रकरणी त्यांचा मुलगा संजय प्रभाकर नागरगोजे (वय ५५, व्यवसाय शिक्षक) यांनी १३ नोव्हेंबर रोजी परळी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या तक्रारीनुसार, ११ नोव्हेंबर रोजी रात्री आठच्या सुमारास वडील घरी नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी आईकडे चौकशी केली. वडील सकाळी घराबाहेर गेल्याचे **(पान २ वर)**

14 Nov 2026 page 2_Layout 1 11/14/2026 12:32 AM Page 1

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक

जगमित्र

विशेष संपादकीय

संस्थांचा वाद, विद्यार्थ्यांचे नुकसान!

शाळा कोणाची, व्यवस्थापन कोणाचे आणि आर्थिक जबाबदारी कोणाची, यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न आहे तो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा. पुण्यातील सिंहगड शिक्षण संस्थेच्या १३ शाळांची मान्यता रद्द करण्याच्या शिक्षण विभागाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने ६ नोव्हेंबर रोजी तात्पुरती स्थगिती दिली. या शाळांमधील शिक्षकांचे अनेक महिन्यांचे वेतन थकीत असल्याने त्यांनी अध्यापनाचे काम बंद केले होते. परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची बाब समोर आली. संस्थेने आर्थिक अडचणी आणि शिक्षण हक्क कायद्यांतर्गत मिळणारी सुमारे १०.५ कोटी रुपयांची प्रलंबित शुल्कप्रतिपूर्ती यांचा मुद्दा मांडला आहे. मात्र या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक नुकसान कोणाचे होत आहे, तर ते विद्यार्थ्यांचे. शिक्षक हा शाळेचा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. त्याला वेळेवर वेतन मिळणे ही केवळ आर्थिक बाब नाही, तर त्याच्या सन्मानाचा आणि कामाच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. शिक्षकांवर अध्यापन, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन, उपक्रम आणि अनेक प्रशासकीय जबाबदाऱ्या असतात. अशा परिस्थितीत अनेक महिने वेतन मिळाले नाही, तर त्याच्या कुटुंबावर आर्थिक ताण येणे स्वाभाविक आहे. शिक्षक समाधानी आणि सुरक्षित नसेल, तर त्याचा परिणाम वर्गातील अध्यापनावर होऊ शकतो. त्यामुळे शाळा व्यवस्थापनाने शिक्षकांच्या वेतनाला सर्वाधिक प्राधान्य दिले पाहिजे. त्याच वेळी शासनानेही मान्यताप्राप्त योजनांचे अनुदान किंवा शुल्कप्रतिपूर्ती वेळेत देण्यासाठी कार्यक्षम व्यवस्था निर्माण केली पाहिजे. शिक्षकांचे वेतन हा खर्च नसून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केलेली गुंतवणूक आहे.

खासगी शाळा चालवणे म्हणजे केवळ इमारत उभारणे, प्रवेश वाढवणे किंवा शाळेची प्रसिद्धी करणे नव्हे. त्यासाठी आर्थिक नियोजन, पारदर्शक व्यवहार, शिक्षकांचे वेतन, विद्यार्थ्यांच्या सुविधा आणि शैक्षणिक गुणवत्तेची जबाबदारी स्वीकारावी लागते. शासनाकडून मिळणाऱ्या निधीला विलंब झाला, तर त्याबाबत योग्य मार्गाने पाठपुरावा करणे आवश्यक आहे; मात्र त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ नये. दुसरीकडे, शिक्षण विभागानेही कारवाई करण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी पर्यायी व्यवस्था आणि स्पष्ट नियोजन केले पाहिजे. शाळेची मान्यता, व्यवस्थापनाचे आर्थिक प्रश्न आणि शिक्षकांचे वेतन यांबाबत निर्णय घेताना विद्यार्थ्यांचे हित सर्वांत वरचे असले पाहिजे. शिक्षण संस्थांमधील वाद सुटतील; पण विद्यार्थ्यांचा वाया गेलेला अभ्यासाचा वेळ कोण परत देणार?आज शिक्षण क्षेत्रात मोठमोठ्या शैक्षणिक योजना, डिजिटल वर्ग, आधुनिक इमारती आणि विविध उपक्रमांची चर्चा होते. पण शाळेत नियमित अध्यापन होत नसेल, शिक्षकांना वेतन मिळत नसेल आणि विद्यार्थ्यांचे वर्ग बंद पडत असतील, तर या सर्व सुविधांचा उपयोग काय? शाळा ही कोणत्याही संस्थेच्या प्रतिष्ठेची किंवा आर्थिक व्यवहारांची जागा नसून विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारे केंद्र आहे. शासन, शिक्षण संस्था आणि शिक्षक या तिन्ही घटकांनी आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. आर्थिक अडचणी असतील तर त्यावर तोडगा निघाला पाहिजे; पण शिक्षण थांबता कामा नये. संस्थांचे प्रश्न महत्त्वाचे असतील, शिक्षकांचे हक्क महत्त्वाचे असतील; पण विद्यार्थ्यांचे भविष्य त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.

जाहिरनामा

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत
जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहीर केले जाते की, **श्री. आकाश दत्तात्रय कसवे,** रा. मिरवट मांडवा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड यांचा मुलगा नामे तुषार आकाश कसवे यांचा जन्म दिनांक 03.08.2024 रोजी स्वा. रा. ती. प्रा. रुग्णालय, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथे झाला असून अर्जदारांनी त्यांच्या सदर कायदेशीर जन्म नोंदीबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदर अर्जदाराचे कायदेशीर जन्म दिनांक 13.10.2023 कायदेशीर नसल्याचे असे कोणास समजवायचे असेल तर या जाहिरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून 15 दिवसांच्या आत त्यांनी या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच लेखी स्वरूपातही कळविण्यात यावे की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकत दाखवली नाही तर सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलेले पुरावे घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदर अर्जदार यांची जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीलदार, अंबाजोगाई

शासकीय मालमत्तेवर दिवसाढवळ्या दरोडा!

तात्काळ सहआरोपी करण्याची आक्रमक मागणी जोर धरू लागली आहे.देवपिंपरी परिसरात भाटेगाव उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. येथे सेल रे पॉवर लिमिटेड कंपनीचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारला जात होता .प्रकल्पाचे संच बसवताना महावितरणच्या उच्चदाब वीज वाहिनीचा अडथळा येत असल्याने, कंपनीच्या सांगण्यावरून अमोल राठोड यांनी कोणतीही पूर्वपरवानगी न घेता महावितरणची यंत्रणा परस्पर उखडून टाकली. सहाय्यक अभियंता श्याम कुंभार यांनी २ नोव्हेंबर रोजी केलेल्या पंचनाम्यात हा धक्कादायक प्रकार समोर आला. कहर म्हणजे, उच्चदाब वाहिनीचे मजबूत खांब हलवून त्या जागी अत्यंत निकृष्ट दर्जाचे लघुदाब वाहिनीचे खांब उभारून सर्वसामान्यांच्या जीविताशी थेट खेळ करण्यात आला आहे.२५ उच्चदाब खांब आणि २ भलीमोठी रोहित्रे हलवणे हे काही एका रात्रीत होणारे काम नाही. त्यासाठी मोठी यंत्रसामग्री आणि कित्येक दिवसांचा कालावधी लागतो. मग इतका मोठा प्रकार भरदिवसा सुरू असताना तत्कालीन उपकार्यकारी अभियंता शाम मोरे यांना याची पुसटशीही कल्पना कशी नव्हती? की अर्थपूर्ण तडजोडीतून याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करण्यात आली? नवीन अधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारताच आणि वरिष्ठांनी दणका देताच याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. यावरून तत्कालीन अधिकाऱ्यांची या बेकायदेशीर कृत्याला मूकसंमती होती, हे स्पष्ट होत असल्याची चर्चा आहे.

नागेवाडीतील अवैध वृक्षतोड प्रकरणी गुन्हे

वनसंरक्षक सुदाम मुंडे यांनी दिली. यासंदर्भात श्री. खरात यांनी मुंबईत श्रीमती मुंडे यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, नागेवाडी या वेगाने प्रगती होणाऱ्या जालन्या नजिकच्या गावातील प्राचीन, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्व असलेली जीपीएस (अर्थात ग्लोबल पोझीशनींग प्रणालीनुसार) क्रमांक १९८६६९९६ आणि ५५८१४२८७ या जागतिक स्थाननिश्चितीवर असलेली पिंपळ, वड आणि अन्य अशी २० झाडे प्लॉटिंग व्यावसायिकांनी चक्क जेसीबी यंत्राद्वारे कत्तल करुन तोडून टाकली आहेत. नागेवाडी येथील श्री मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर ता. ११ नोव्हेंबरला वीसपेक्षा अधिक मोठ्या वृक्षांची मुळासकट बेकायदेशीर कत्तल करण्यात आली असून, यातील वडाची पिंपळाची झाडे पर्यावरणीय दृष्ट्या महत्त्वाची असून, संरक्षित असतांनाही निर्दयीपणे तोडण्यात आली आहेत. झाडांची ही बेकायदेशीर कत्तल प्लॉटींगसारख्या व्यवहारांसाठी आणि आर्थिक लाभासाठी करण्यात आली असून, तोडण्यात आलेली लाकडे तात्काळ ट्रकमध्ये भरुन विक्रीसाठी नेण्यात आली आहेत. या प्रकारामुळे शासनाचे महसुलीचेही मोठे नुकसान आणि पर्यावरणाचीही मोठी हानी झाली असल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे वडाचे झाड हे पौराणिक धार्मिक वारसा असलेले सुमारे पंच्याहत्तर वर्षांपुर्वीचे झाड असल्याने त्याची कत्तल हा महाराष्ट्र वृक्ष संरक्षण अधिनियम १९७५ मधील सुधारित तरतुदीनुसार हेरीटेज ट्री तसेच कलम आठ आणि २१ नुसार अत्यंत गंभीर आणि अजामिनपात्र गुन्हा असल्याचेही नमूद करीत पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे गंभीर उल्लंघन असल्याचा दावाही करण्यात आला आहे.

दरम्यान, वडाच्या झाडासह सर्वच झाडांच्या कत्तलीबद्दल उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी जमीन मालक, प्लॉटींग व्यावसायिक तसेच जेसीबी यंत्राच्या चालक, मालकावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, तोडलेले लाकूड विशेषतः वडाचे लाकूड जप्त करुन लाकूड तस्करीची सखोल चौकशी करावी. आणि जालना जिल्ह्यातील वाढत्या बेकायदेशीर वृक्ष तोडीला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशा मागण्या श्री. खरात यांनी पर्यावरणमंत्री श्रीमती मुंडे यांच्याकडे केल्या आहेत. शिवाय, ७ दिवसात कारवाई न झाल्यास राष्ट्रीय हरित लवाद पुणे यांच्याकडे याचिका करणार असल्याचाही इशारा देण्यात आला आहे.

स्वतंत्र कर्मचाऱ्याची नेमणूक करा–जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

प्रलंबित असलेल्या तक्रारींची सद्यस्थिती जाणून घेत शेतकऱ्यांना आपल्या तक्रारी मांडणे सोपे व सुटसुटीत व्हावे, यासाठी प्रशासकीय स्तरावर एक स्वतंत्र आणि प्रमाणित तक्रार नमुना तातडीने तयार करावा, जेणेकरुन आपल्याला निपटारा झालेल्या व प्रलंबित असलेल्या तक्रारींचा शोध घेणे सोयीचे होईल. असेही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले.सध्या काही प्रमाणात शेतकरी फार्मर आयडी, ई–केवायसी आणि आधार प्रमाणीकरणातील तांत्रिक त्रुटींमुळे कर्ज व इतर शासकीय लाभापासून वंचित राहत आहेत. यावर गांभीर्याने लक्ष केंद्रित करत आधार प्रमाणीकरण आणि ई–केवायसी विषयक सर्व तांत्रिक अडचणी प्राधान्याने सोडविण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना केल्या. तसेच बँका आणि सहकार विभागाने समन्वयाने काम करून शेतकऱ्यांना सहकार्य करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच यावेळी शेतकऱ्यांच्या समस्याचा सखोल आढावा घेतला.

समृद्धी महामार्गावर भीषण अपघातांची मालिका!

बाहेर काढले. ट्रकमधील सिमेंट अपघातामुळे सर्वत्र विखुरले गेल्याने रस्त्यावर दिसणे अंधुक झाले होते. याचवेळी रहदारीला अडथळा होऊ नये म्हणून, अपघातग्रस्त ट्रक बाजूला काढण्यासाठी मागून येणारी वाहने थांबविली गेली. तसेच हा अपघात पाहून नेमके काय घडले, अपघातग्रस्तांना मदतीची गरज आहे का, याची माहिती घेण्यासाठी तसेच उत्सुकतेपोटी अनेक कारचालकांनी आपली वाहने थांबवली. परिणामी अपघातस्थळाच्या परिसरात कारच्या रांगा लागल्या. मात्र, हीच बाब पुढील मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरली.कारची रांग लागलेली असतानाच मागून वेगाने येणाऱ्या एका ट्रकने रांगेतील कारना जोरदार धडक दिली आणि धडक दिल्यानंतर तो ट्रक घटनास्थळावरून पसार झाला. या धडकेमुळे रांगेतील उभ्या असलेल्या कार एकापाठोपाठ एक पुढील वाहनांवर आदळल्या. त्यामुळे अनेक कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघातात नुकसान झालेल्या कारची संख्या २५ पेक्षाही अधिक असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

काही कारचालक निघून गेल्याने वाहनांची नेमकी संख्या अस्पष्ट!

या घटनाक्रमात काही कारचे मोठे नुकसान झाले, तर काही वाहनांना किरकोळ खरचटले. किरकोळ नुकसान झालेल्या काही कारचालकांनी घटनास्थळावरून पुढील प्रवास सुरू केल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे या साखळी अपघातात नेमक्या किती कारचे नुकसान झाले, याची निश्चित संख्या समोर येणे कठीण झाले आहे. प्रत्यक्ष नुकसानीचा आकडा संबंधित यंत्रणांच्या पाहणीनंतरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

पोलीस व आरोग्य विभागाची घटनास्थळी धाव; गंभीर दुखापत नाही!

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि आरोग्य विभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातातील किरकोळ जखमींना वैद्यकीय उपचार देण्यास सुरुवात करण्यात आली. सुदैवाने या संपूर्ण घटनाक्रमात कोणालाही गंभीर दुखापत झाली नसल्याची माहिती आहे.दरम्यान, अपघातग्रस्त ट्रक आणि कार महामार्गाच्या बाजूला हटविण्याचे काम सुरू करण्यात आले. वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी खबरदारी घेत एका बाजूने वाहतूक सुरू ठेवली.

अपघात पाहण्यासाठी वाहन थांबविणे ठरू शकते जीवघेणे!

समृद्धी महामार्गावर घडलेल्या या घटनाक्रमातून एक महत्त्वाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महामार्गावर एखादा अपघात घडल्यास केवळ उत्सुकतेपोटी आपले वाहन रस्त्यावर थांबवून अपघात पाहणे किती धोकादायक ठरू शकते, याचे हे जिवंत उदाहरण आहे. मदतीची भावना महत्त्वाची असली, तरी त्यासाठी वाहतुकीला अडथळा निर्माण न करता सुरक्षित अंतर राखणे आणि आपत्कालीन यंत्रणांना सहकार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा एका अपघातातून अनेक वाहनांच्या अपघातांची साखळी निर्माण होऊन निष्पाप प्रवाशांचे जीव धोक्यात येऊ शकतात.

आ.रत्नाकर गुट्टे काय भूमिका घेणार?

पाठविण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.

या पार्श्वभूमीवर ॲड. रामजी मणियार यांनी आमदार रत्नाकररावजी गुट्टे साहेब यांना निवेदन देऊन दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

आता जनतेचे थेट प्रश्न!

- चौकशी अहवालानंतर दोषींवर प्रत्यक्ष कारवाई होणार का?
- संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का?
- संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यासाठी पुढाकार घेतला जाणार का?
- जनतेच्या पैशाचा हिशोब जनतेसमोर मांडला जाणार का?

संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष!

आमदार साहेब, विकासासाठी निधी देणे ही महत्त्वाची बाब आहे; पण त्या निधीतून झालेल्या कामांचा हिशोब घेणे आणि गैरव्यवहार सिद्ध झाल्यास दोषींवर कारवाईसाठी पाठपुरावा करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे.आता आमदार रत्नाकरराव गुट्टे साहेब या प्रकरणात कोणती ठोस भूमिका घेतात, दोषींवर कारवाईसाठी काय पावले उचलतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.पालमच नव्हे, तर पूर्णा आणि गंगाखेडसह संपूर्ण विधानसभा मतदारसंघाचे लक्ष या प्रकरणातील पुढील घडामोडींकडे लागले आहे!

परळीतून ८१ वर्षीय वृद्ध बेपत्ता

समजल्यानंतर त्यांनी परळीतील बहिणींसह इतर नातेवाईकांकडे फोन करून विचारणा केली. मात्र, ते कोणाकडेही गेले नसल्याचे स्पष्ट झाले.त्यानंतर संजय नागरगोजे आणि त्यांचा मुलगा पवन यांनी परळी बसस्थानक, रेल्वेस्थानक तसेच शहरातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी शोध घेतला. परळीबाहेरील नातेवाईकांकडेही चौकशी करण्यात आली; मात्र प्रभाकर नागरगोजे यांचा कुठेही ठावठिकाणा लागला नाही.वृद्ध प्रभाकर नागरगोजे यांना कानाने कमी ऐकू येत असल्याने ते मोबाईल फोन वापरत नसल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी वडिलांना पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत संजय नागरगोजे यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध पोलिसांत फिर्याद दिली.

शेवटच्या पानावरून...

नायगाव टोलनाक्याची उच्चस्तरीय चौकशी करा

चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणण्याची गरज आहे.या प्रकरणी टोलनाक्याचे व्यवस्थापक देवेंद्र सिंन्ह यांच्याशी संपर्क साधला असता, या टोलनाक्यावरून कोणालाही सूट मिळणार नसल्याचे त्यांनी सांगितल्याचे समजते. मात्र, वाहनधारकांचा सवाल स्पष्ट आहेसूट मिळत नसेल, तर किमान नियमांनुसार सर्व सुविधा आणि पारदर्शक टोलवसुली तरी सुनिश्चित करा. त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकारी व टोल प्रशासनाने नायगाव टोलनाक्याची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करावी, नगदी स्वरूपातील वसुलीचे नियम व नोंदी तपासाव्यात, सुरक्षाव्यवस्था आणि महिला सुविधांची पाहणी करावी, तसेच दोष आढळल्यास संबंधित व्यवस्थापकावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

वाहनचालकाची संतप्त प्रतिक्रिया

''ऑनलाइन टोल ७० रुपये, मग ५० रुपये नगदी कशासाठी?''''मी घनसांगी येथून तळणीकडे जात असताना माझी स्कॉर्पिओ गाडी नायगाव टोलनाक्यावर आली. माझ्या गाडीचा ऑनलाइन टोल ७५ रुपये असताना टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांनी माझ्याकडून ५० रुपये नगदी स्वरूपात घेतले आणि गाडी सोडून दिली. हा प्रकार नेमका कोणत्या नियमांनुसार सुरू आहे, याची चौकशी झाली पाहिजे. टोलवसुलीच्या नावाखाली शासनाच्या महसुलात अनियमितता होत असेल, तर ही गंभीर बाब आहे. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी टोलनाक्याची उच्चस्तरीय चौकशी करून व्यवस्थापकावर कारवाई करावी.''

रोख रक्कम स्वीकारण्याबाबत

केंद्र सरकारच्या २० फेब्रुवारी २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, १ एप्रिल २०२६ पासून राष्ट्रीय महामार्गावरील पथकर नाक्यांवर रोख रक्कम स्वीकारणे बंद करून केवळ फास्टॅग किंवा एकत्रित देयक पद्धतीद्वारेच पथकर वसूल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, नायगाव पथकर नाक्यावर सध्या प्रत्यक्षात रोख रक्कम स्वीकारली जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शासनाच्या नियमांची अंमलबजावणी नेमकी कशा प्रकारे केली जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

घटकांना प्रामुख्याने सामावून घ्यावे–जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, समाज कल्याणचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी एफ.एम.शेख, जिल्हा कार्यक्रम अधिकारी कालिदास बडे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक केदार गरड यांच्यासह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले की, राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग आणि महिला व बालविकास विभागामार्फत हे अनुदान दिले जाते. या योजनेचा लाभ खऱ्या गरजूपर्यंत पोहोचविण्यासाठी समाज कल्याण आणि महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गाव, वाडी, वस्ती आणि तांड्यावर भेटी देवून पुढील डिसेंबर महिन्यात विवाह करू इच्छिणाऱ्यांची माहिती संकलित करावी. या कामात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच या उपक्रमाची गावागावात जनजागृती करण्याची जबाबदारी तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे. गावातील इच्छुक लाभार्थ्यांचे अर्ज जमा करण्यासाठी अंगणवाडी सेविकांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अंगणवाडी सेविकांनी प्राप्त झालेले अर्ज तातडीने बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे दाखल करावेत. हा जिल्हा प्रशासनाचा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असून, सर्व तालुक्यांमध्ये त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्यात येत्या १४, १५, ३० आणि ३१ डिसेंबर २०२६ रोजी हे सामूहिक विवाह सोहळे पार पडणार आहेत. यामध्ये इच्छुक असलेल्या नवदांपत्यांच्या प्राप्त अर्जाचे अवलोकनही त्यांनी यावेळी केले. तहसीलदार, गटविकास अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी सर्व गावामध्ये याची जनजागृती करावी. अशा सुचनाही केल्या.

रेणुकाई संगीत विद्यालयाचा
'स्वरदीपोत्सव २०२६'

शास्त्रशुद्ध शिक्षण देऊन त्यांच्यातील कलागुणांना वाव देणे, नवोदित कलाकार घडवणे आणि माजलगावच्या सांस्कृतिक क्षेत्रात संगीताची परंपरा अधिक समृद्ध करणे हा विद्यालयाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.या संगीत सोहळ्यात शांभवी काळे, विदुला पाठक, शरयू शिंदे, चित्रा शिंदे, मनस्वी खुर्पे, मीनल पगारिया, अन्वी जाधव, श्रेया ठोंगे, रेणुका कांकरिया, अंकुश साबळे, प्रसाद पटवारी, चैतन्य आहेर, गणेश विभुते, सुबोध देशपांडे, प्रथमेश खुर्पे, सार्थक वझे, दिगंबर महाजन तसेच विद्यालयाचे संचालक कुणाल कुलकर्णी यांनी विविध सुरेल गीतांचे सादरीकरण केले.

यामध्ये 'विठ्ठला तू वेडा कुंभार', 'घन ओथंबून येती', 'कौसल्येचा राम', ' कशी मी जाऊ', 'पायोजी मैंने', 'एक राधा एक मीरा', 'आज जाने की जिद ना करो', 'चौदहवीं का चाँद', 'दत्ता दयाघना रे', 'गेला हरी कुण्या गावा', 'वेडा वेडा रे पंढरी', 'चदरिया झिनी रे झिनी', 'राधे तुला' आणि 'गा बाळांनो श्रीरामायण' अशा विविध भक्तिगीत, भावगीत व हिंदी गीतांनी रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे बहारदार निवेदन श्री. नंदकुमार कुलकर्णी यांनी केले. माजलगावातील वैद्यकीय क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र या सर्वच क्षेत्रातील संगीतप्रेमी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली. सुरेल स्वर, उत्तम सादरीकरण आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे 'स्वरदीपोत्सव २०२६' हा दीपावलीचा अविस्मरणीय सांगीतिक सोहळा ठरला.

अल्ट्राटेक सिमेंट प्रशासनाचा मनमानी कारभार

केले. एवढेच नव्हे तर कामगारांना शासकीय परवाना परीक्षेला बसता येऊ नये म्हणून त्यांचे हजेरी पत्रक देखील जाणीवपूर्वक लपवून ठेवण्यात आले.

हक्काचे वेतन मागितले म्हणून थेट गेटबंदी!

कामगारांनी जेव्हा कामगार आयुक्तांकडे कायद्यानुसार समान काम समान वेतन आणि हक्काच्या दिवाळी बोनसची मागणी केली, त्याचाच राग मनात धरून स्थानिक एच.आर. मॅनेजर आणि तांत्रिक प्रमुखांनी ५ सप्टेंबर रोजी कामगारांना कोणतीही लेखी नोटीस न देता बेकायदेशीरपणे गेटवर अडवून नोकरीवरून काढून टाकले.

शासकीय पीएफ रेकॉर्ड ठरला सर्वात मोठा पुरावा

व्यवस्थापनाने कामगारांना कामावरून काढताना पगार पावती देण्यास नकार दिला असला, तरी भारत सरकारच्या अधिकृत पीएफ पासबुकवर एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२६ पर्यंत या कामगारांच्या नावे कंत्राटदाराकडून नियमित पीएफ जमा झाल्याची स्पष्ट नोंद आहे. हा अधिकृत सरकारी रेकॉर्ड व्यवस्थापनाचा खोटारडेपणा उघडा पाडणारा सर्वात मोठा पुरावा ठरला आहे.

कामगार अधिकारी बीड यांच्याकडून व्यवस्थापनाला समन्स

या अन्यायाविरुद्ध कामगारांनी बीड येथील कामगार अधिकारी यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल केली असून, त्याची गंभीर दखल घेत कामगार अधिकाऱ्यांनी कंपनी व्यवस्थापन व कंत्राटदाराला अधिकृत नोटीस बजावून १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सुनावणीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. कंपनीचे कोट्यवधींचे नुकसान होण्याची शक्यता अनुभवी कामगारांना केवळ वैयक्तिक अहंकारातून बाहेर काढल्यामुळे सध्या कंपनीच्या तांत्रिक विभागात दैनंदिन बिघाड आणि देखभाल करण्यात प्रचंड अडचणी येत आहेत. जुन्या कुशल स्टाफशिवाय प्लांट चालवणे अशक्य असल्याचे अंतर्गत सूत्रांकडून कळत असून, स्थानिक प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे कंपनीच्या कोट्यवधी रुपयांच्या उपकरणांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कामगारांनी या संपूर्ण घोटाळ्याची आणि छळाची तक्रार थेट मुंबई येथील आदित्य बिर्ला समूहाच्या चेअरमन कार्यालयातील दक्षता पथकाकडे देखील केली आहे.आता संपूर्ण परिसराचे लक्ष १६ नोव्हेंबरला होणाऱ्या शासकीय सुनावणीकडे लागले असून, बीड कामगार न्यायालय स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देणार का, याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

श्रीकृष्ण मंदिर हजारो दिव्यांनी उजळले

जाधव, साळुंके, काळे, दया स्वामी, आदी सहभागी झाले होते. सायंकाळच्या शांततेत मावळतीला निघालेला सूर्य व अमावस्ये नंतर निघणारा चंद्र, झोंबणारा थंड वारा आणि परिसरात रेखाटलेल्या रांगोळ्या एका उत्सवासाठी सज्ज होत्या. सायंकाळी ६ वाजता मेणबत्ती प्रज्वलति झाल्या, मंदिर व परिसरात एका रेषेत लावलेल्या पणत्या मेणबत्तीने प्रज्वलति होऊ लागल्या. पणत्यांच्या उभ्या,आडव्या रेषा एकमेकांत गुंफल्या गेल्या आणि श्रीकृष्ण मंदिर हजारो ज्योतीने उजळून निघाले. दीपोत्सवाने श्रीकृष्ण मंदिराला चढलेला साज पाहण्यासाठी सायंकाळी परळीकरांनी मोठी गर्दी केली होती.

नूतन आमदार डॉ.प्रतापसिंह पाटील यांचा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के

आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा सन्मान करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. पदवीधर मतदारसंघातून मिळालेला हा विजय मराठवाड्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाची ताकद अधिक बळकट करणारा असून, पदवीधरांचे प्रश्न, युवकांचे भविष्य आणि मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या माध्यमातून प्रभावी कार्य घडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.विशेष म्हणजे, विजय संपादन केल्यानंतरही मतदार बांधवांशी असलेले आपुलकीचे नाते जपत डॉ. पाटील यांनी प्रत्यक्ष भेटीगाठींच्या माध्यमातून संवाद साधण्याचा घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याची भावना रायगड गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी व्यक्त केली. विजयानंतर पुन्हा एकदा बीडमध्ये येऊन मित्रपरिवार व मतदार बांधवांची भेट घेतल्याबद्दल ग्रुपच्या सदस्यांनी समाधान व्यक्त केले.यावेळी रायगड गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य व मित्रपरिवार उपस्थित होते. या सदिच्छा भेटीच्या निमित्ताने झालेल्या स्नेहपूर्ण सत्कार सोहळ्यातून जिव्हाळा, आपुलकी आणि नव्या राजकीय प्रवासासाठी शुभेच्छांची भावना व्यक्त झाली.

बी.ए.एम.एस. प्रवेशासाठी पात्र ठरल्याबद्दल जान्हवी शामभाऊ बुद्रे

परिसरातूनही कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या हातून भविष्यात उत्तम वैद्यकीय सेवा घडावी आणि त्यांनी आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवावा, अशा सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी परमेश्वर बुद्रे, मनोज चौंडे सर, गणपत हरंगुळे, सोमनाथ गोपनपाळे सर, दत्तात्रय गोपनपाळे, सुशिल हरंगुळे, सुरेश काकासाहेब बुद्रे, सुनील नांदुरे, ओम वाघमारे, सेलूकर भाऊजी, महेश बुद्रे, बीटु बुद्रे, संदीप बुद्रे, उमाकांत बुद्रे यांच्यासह नांदुरवेस भागातील नातेवाईक, नागरीक यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

कुणबी नोंदी शोधण्यासाठी १२ ते २० नोव्हेंबरदरम्यान

मदत घेण्याची तरतूद करण्यात आली आहे .

बीड जिल्ह्यात प्रशासकीय समन्वयातून मोहीम :बीड जिल्ह्यात या विशेष मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन व समन्वयावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे जिल्हास्तरीय प्रशासकीय समन्वयात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत . तसेच बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या माध्यमातून उपविभागीय स्तरावरील समन्वय आणि संबंधित यंत्रणांशी संपर्क ठेवण्याचे काम केले जाणार आहे . विभागीय आयुक्त जी . श्रीकांत यांच्या स्तरावर विभागातील जिल्ह्यांमधील कामकाजाचा समन्वय साधला जाणार आहे . विशेष म्हणजे बीड उपविभागात म्हणजेच बीड गेवराई आणि शिरूर कासार या तालुक्यात सर्वाधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप मागील कालावधीत झालेल आहे .

बीड तालुक्याच्या संदर्भात तहसील कार्यालयाच्या माध्यमातून उपलब्ध शासकीय अभिलेखांची तपासणी , संबंधित विभागांशी समन्वय आणि आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन याबाबत कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिली . शासनाच्या निर्देशानुसार निश्चित कालावधीत ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले . जुन्या अभिलेखांचा शोध महत्त्वाचा : कुणबी नोंदी शोधण्याच्या प्रक्रियेत जुन्या शासकीय कागदपत्रांचे आणि अभिलेखांचे महत्त्व मोठे आहे . त्यामुळे संबंधित कार्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या जुन्या नोंदवह्या , अभिलेख आणि दस्तऐवजांची काळजीपूर्वक तपासणी करणे आवश्यक आहे . मोडी लिपीतील नोंदींचे वाचन , वंशावळीसंबंधी उपलब्ध माहिती आणि अभिलेखांतील नोंदींची पडताळणी यासाठी तज्ज्ञांचे सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे . या प्रक्रियेत नोंदींची अचूकता , दस्तऐवजांची विश्वासार्हता आणि शासनाने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीचे पालन यांना प्राधान्य दिले जाणार आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नागरिकांना आवाहन केले की , कुणबी नोंदी शोध मोहिमेसाठी प्रशासनाला आवश्यक ते सहकार्य करावे . आपल्या कुटुंबाशी संबंधित जुने शासकीय अभिलेख , उपलब्ध कागदपत्रे किंवा नोंदींबाबत माहिती असल्यास ती संबंधित अधिकृत कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यावी . कोणत्याही अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये तसेच शासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे . अभिलेख तपासणीची प्रक्रिया पारदर्शक आणि नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे . २० नोव्हेंबरपर्यंत विशेष शोधमोहीम : १२ नोव्हेंबरपासून सुरू होणारी ही विशेष मोहीम २० नोव्हेंबर २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे . या कालावधीत जिल्हानिहाय नियोजनानुसार शासकीय कार्यालयांमधील अभिलेखांची तपासणी करून कुणबी नोंदी शोधण्याचे काम केले जाणार आहे . विभागीय स्तरावरील निर्देशांनुसार बीड जिल्ह्यातील संबंधित यंत्रणांनीही या मोहिमेसाठी सज्ज राहण्याची आवश्यकता आहे . अभिलेखांचा शोध , तज्ज्ञांचे सहकार्य आणि प्रशासकीय समन्वय यांच्या माध्यमातून ही प्रक्रिया अधिक परिणामकारक करण्याचा प्रयत्न राहणार आहे .

जागतिक मधुमेह दिनानिमित्त डॉ.अतुल शिंदे यांचे

होण्यास विलंब होतो. बैठी जीवनशैली, जंक फूडचे वाढते सेवन, गोड पदार्थांचे अतिसेवन, अपुरी झोप आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे मधुमेहाचा धोका वाढत आहे. भारतीयांमध्ये इन्सुलिन प्रतिरोधाची प्रवृत्ती तुलनेने अधिक आढळत असल्याने मधुमेहाबाबत विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.मधुमेहावर नियंत्रण न ठेवल्यास डोळ्यांची दृष्टी कमी होणे, मूत्रपिंड निकामी होणे, हृदयविकार, हृदयविकाराचा झटका तसेच पायांमधील नसांवर आणि रक्तपुरवठ्यावर परिणाम होऊन गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते. काही प्रकरणांत पाय कापण्याची वेळही येऊ शकते. विशेष म्हणजे, एचबीए१सी (१) या दीर्घकालीन रक्तशर्करा मापकाचे प्रमाण एक टक्क्याने कमी केल्यास डोळे, मूत्रपिंड आणि हृदयाशी संबंधित गुंतागुंतींचा धोका लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होते.मधुमेह टाळण्यासाठी आणि नियंत्रणात ठेवण्यासाठी दररोज किमान ३० मिनिटे चालणे, योगासने किंवा सायकलिंग करणे आवश्यक आहे. आहारात संतुलित व पौष्टिक पदार्थांचा समावेश करावा. साखर, मैदा, तेलकट व तळलेले पदार्थ मर्यादित ठेवावेत. नियमित उपाशीपोटी व जेवणानंतर रक्तातील साखरेची तपासणी करावी. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार दर तीन ते सहा महिन्यांनी एचबीए१सी तपासणी करावी. तसेच ताणतणाव कमी ठेवणे, मद्यपान व धूम्रपान टाळणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे बंद न करणे महत्त्वाचे आहे. असे मधुमय तज्ञ डॉ अतुल शिंदे यांनी सांगितले.

मधुमेहाविषयी जागरूकता हे निरोगी जीवनाकडे जाणारे पहिले पाऊल आहे. नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याची नियमित काळजी घेतली, वेळेवर तपासणी केली आणि जीवनशैलीत आवश्यक बदल केले.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — शनिवार दि.१४ नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.३

मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे सदर बाजार पोलिसांचे आवाहन

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील टांगा स्टँड रोडवरील धनंजय कॉलेजच्या इमारतीसमोर, सारस्वत क्लिनिकजवळ रस्त्याच्या कडेला एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. सदर बाजार पोलिसांनी मृताची ओळख पटविण्यासाठी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास हा पुरुष मृतावस्थेत आढळला. त्यानंतर रुग्णवाहिकेद्वारे त्याला जालना येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले.

मृत पुरुषाचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे, उंची १६६ सेंटीमीटर, रंग सावळा, केस मध्यम काळे, डोळे काळे, चेहरा गोल आणि मिशी बारीक काळी असल्याचे वर्णन पोलिसांनी दिले आहे. त्याच्या अंगावर फुल बाह्यांचा शर्ट व फुल पँट होती. तसेच हातावर मराठी अक्षरात 'मुकेश सुरेश लिंगे' असे गोंदलेले असून, त्याच ठिकाणी इंग्रजीमध्ये 'चींज्ञशीह' व 'ॐ' अशी चिन्हे गोंदलेली आहेत. या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू क्रमांक ५६/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १९४ प्रमाणे १२ नोव्हेंबर २०२६ रोजी नोंद करण्यात आली आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. सदर मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी नागरिकांनी सदर बाजार पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस हवालदार आर.सी. कु-हाडे यांनी केले आहे.

रेकॉर्डवरील गुन्हेगारांकडून गावठी कट्टा जप्त; जालना सदर बाजार डीबी पथकाची धडाकेबाज कारवाई

जालना । ज्ञानेश्वर साळुंके

जालना शहरातील अवैध धंदे आणि रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी सदर बाजार पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत २० हजार रुपये किमतीचा गावठी बनावटीचा कट्टा (अग्निशस्त्र) जप्त केला आहे. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी डीबी (गुन्हे प्रकटीकरण) पथकाला शहरात गस्त घालून पाहिजे असलेले फरार आरोपी आणि अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. पथक पेट्रोलिंग करत असताना पोलीस निरीक्षक भारती यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, जयेश राजपूत आणि त्याचा मित्र नंदू पारवे (रा. कोष्टी गल्ली, जालना) यांच्याकडे गावठी कट्टा आहे. या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप व त्यांच्या पथकाने सापळा रचून नंदू अभय पारवे (वय १९, रा. कोष्टी गल्ली, जालना) याला ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्याने काही दिवसांपूर्वी जयेश राजपूत याच्याकडून वापरण्यासाठी गावठी कट्टा घेतला होता, मात्र तो पुन्हा जयेशला परत दिल्याची कबुली दिली.

त्यानंतर डीबी पथकाने तत्काळ हालचाली करत जयेश किशोरसिंग राजपूत (वय २१, रा. बालाजी गल्ली, गांधीनगर, जालना) याला बालाजीनगर परिसरातून ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, परंतु पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने गांधीनगर येथील 'गौरी जिनिंग'च्या पाठीमागील बाजूस कट्टा लपवून ठेवल्याचे सांगितले. पोलिसांनी पंचासमक्ष त्या ठिकाणाहून स्टील बॉडी असलेला २०,००० रुपये किमतीचा गावठी कट्टा जप्त केला. अटक करण्यात आलेले दोन्ही आरोपी पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, सदर बाजार पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध कलम ३/२५ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे प्रमुख पोउपनि सचिन सानप, पोहेकॉ तानाजी कानुरे, जगन्नाथ जाधव, बोडखे, पोकॉ भगवान मुंजाळ, दुर्गेश गोफणे, अजीम शेख, संदीप गोतीस, राहुल कटकम आणि धनंजय लोंढे यांच्या पथकाने पार पाडली.



महाराष्ट्रातील आमदारांनी दिव्यांगांच्या सहा हजार रुपये मानधनाच्या मागणीला पाठिंबा द्यावा : शेख अनिस

अपंग जनता दल सामाजिक संघटनेची मराठवाडा विभागीय बैठक उत्साहात संपन्न; हिवाळी अधिवेशनात आवाज उठविण्याचे आवाहन

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्व आमदारांनी दिव्यांगांना दरमहा सहा हजार रुपये मानधन मिळावे, या मागणीला पाठिंबा देऊन विधिमंडळात आवाज उठवावा, असे आवाहन अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख अनिस यांनी केले. जालना येथील सर्वे क्रमांक ४८८ मधील शासकीय विश्रामगृहात अपंग जनता दल सामाजिक संघटनेची मराठवाडा विभागीय बैठक उत्साहात संपन्न झाली. या बैठकीनिमित्त पत्रकार परिषदेचेही आयोजन करण्यात आले होते.



पत्रकार परिषदेत बोलताना शेख अनिस म्हणाले की, दिव्यांग बांधवांना सध्या मिळणारे मानधन त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी अपुरे पडत आहे. त्यामुळे दिव्यांगांना दरमहा सहा हजार रुपये मानधन देण्याची मागणी शासनाकडे करण्यात येत आहे. या मागणीसाठी आमदार रवी राणा तसेच बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी दिव्यांगांच्या मागणीला पाठिंबा देत मंत्री अतुल सावे यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील सर्व आमदारांनी मंत्री अतुल सावे यांना निवेदन देऊन आगामी हिवाळी अधिवेशनात दिव्यांगांच्या सहा हजार रुपये मानधनाच्या मागणीसाठी ठामपणे आवाज उठवावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जालना जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी मराठवाड्यातील सर्व पदाधिकाऱ्यांना स्थानिक पातळीवर पुढाकार घेण्याचे आवाहन केले. प्रत्येक जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी आपल्या स्थानिक आमदारांची भेट घेऊन दिव्यांगांच्या सहा हजार रुपये मानधनाच्या मागणीसाठी निवेदन द्यावे आणि या प्रश्नाला विधिमंडळात वाचा फोडण्यासाठी पाठपुरावा करावा, असे ते म्हणाले. या बैठकीला जालना शहराध्यक्ष कामरान काजी, रेणुका वाहुळकर, करण डोईफोडे, जेदश काळे, गणेश पक्खुले, विष्णू मस्के, सातवाजी कावळे, करामत शहा, नंदकिशोर चव्हाण यांच्यासह मराठवाड्यातील अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलिस कर्मचाऱ्याच्या कथित सहभागाचा आरोप; कारवाई न झाल्यास सर्व तक्रारदार शेतकरी आमरण उपोषणाला बसणार!

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील केंधळी गावातील शेतकऱ्यांच्या मोटार चोरी प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. मोटार चोरीच्या घटनेबाबत यापूर्वी वारंवार निवेदने आणि तक्रारी देऊनही मागील चार महिन्यांपासून कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात संबंधित पोलीस कर्मचाऱ्याच्या भूमिकेबाबतही संशय व्यक्त करण्यात आला असून, त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या प्रकरणात यापूर्वी निवेदन देऊनही पोलिस प्रशासनाकडून अपेक्षित कार्यवाही न झाल्याने अखेर संतप्त शेतकऱ्यांनी १३ नोव्हेंबर रोजी मंठा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांना पुन्हा निवेदन सादर केले आहे. या निवेदनातून पोलिस प्रशासनाला आठ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.



केंधळी गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील मोटार चोरीच्या घटनांबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप शेतकऱ्यांना त्यांच्या मोटारी परत मिळालेल्या नाहीत. चार महिने उलटूनही तपासात ठोस प्रगती दिसत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. चोरीच्या प्रकरणात संबंधित पोलीस कर्मचाऱ्याचा सहभाग असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला असून, या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आता आठ दिवसांचा अल्टिमेटम!

पुढील आठ दिवसांत संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर योग्य ती कारवाई करून शेतकऱ्यांच्या चोरीस गेलेल्या मोटार पंप परत मिळवून द्यावेत, अन्यथा केहाळी गावातील सर्व तक्रारदार शेतकरी आमरण उपोषणास बसणार असल्याचा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. तसेच यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. चार महिने तक्रारी करूनही न्याय नाही, आता उपोषणाशिवाय पर्याय उरला नाही का?

शेतकऱ्यांच्या शेतीसाठी मोटार पंप ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे. मोटारी चोरीला गेल्यानंतर आर्थिक नुकसान तर झालेच, पण वारंवार तक्रारी करूनही न्याय मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी दाद मागायची तरी कोणाकडे? यापूर्वीच्या निवेदनाची दखल घेऊन कारवाई का झाली नाही, तपास नेमका कुठपर्यंत पोहोचला आणि चोरीस गेलेल्या मोटारींचा शोध का लागला नाही, असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

पोलिस प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन आरोपांची निष्पक्ष चौकशी करावी, दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे. आता दिलेल्या आठ दिवसांच्या मुदतीत पोलीस प्रशासन काय भूमिका घेते, याकडे केंधळीतील शेतकऱ्यांसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दुष्काळाच्या संकटात शेतकरी कुटुंबाला मिळाला शासनाचा आधार!

शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जपले माणुसकीचे नाते

भिलपुरीतील अंबादास तांगडे कुटुंबाच्या आयुष्यात आशेचा नवा किरण; मुलीच्या शिक्षणापासून विवाहापर्यंतची जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वीकारली

जालना । प्रतिनिधी

दुष्काळ परिस्थिती, अपुरे शेती उत्पन्न आणि वाढत्या आर्थिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांचे जीवन दिवसेंदिवस आव्हानात्मक बनत आहे. अशा परिस्थितीत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला आधार आणि मदतीचा हात दिल्याने संकटग्रस्त कुटुंबांनाही नव्या उमेदीने उभे राहण्याचे बळ मिळू शकते. याचे संवेदनशील उदाहरण जालना तालुक्यातील भिलपुरी येथील अंबादास तांगडे यांच्या कुटुंबाच्या माध्यमातून समोर आले आहे.

भिलपुरी येथील अंबादास तांगडे यांच्याकडे केवळ एक एकर शेती आहे. पत्नी मंदाबाई, दोन मुली, एक मुलगा आणि आई अशा सहा जणांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह याच शेतीवर अवलंबून आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीसमोर निर्माण झालेली आव्हाने आणि मर्यादित उत्पन्न यामुळे कुटुंबाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रतिकूल परिस्थिती असूनही कुटुंबाने जिद्द आणि कष्टाच्या जोरावर आपला संसार सुरू ठेवला आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना तालूक्यातील भिलपुरी येथील अंबादास तांगडे यांच्या घरी भेट दिली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दिवाळीच्या सणानिमित्त त्यांनी तांगडे कुटुंबासोबत वेळ घालवला आणि त्यांच्या घरातील पारंपरिक ग्रामीण भोजनाचाही आस्वाद घेतला. शेतकरी कुटुंबातून आलेला असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी आणि वेदनांची आपल्याला जाणीव असल्याचे सांगत, शासन कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या भेटीदरम्यान तांगडे कुटुंबातील मुलीशी संवाद साधताना तिला भविष्यात पोलीस अधिकारी होण्याची इच्छा असल्याचे समजले. तिच्या या स्वप्नाला बळ देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तिच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. तसेच भविष्यात तिच्या विवाहाची जबाबदारीही घेण्याची घोषणा केली. आर्थिक परिस्थितीमुळे मुलींच्या शिक्षणाला किंवा त्यांच्या भवितव्याला मर्यादा येऊ नयेत, या भावनेतून घेतलेल्या या निर्णयामुळे तांगडे कुटुंबाला मोठा आधार मिळाला आहे. एका शेतकरी कुटुंबातील मुलीच्या स्वप्नांना शासनस्तरावरून मिळालेला हा पाठिंबा ग्रामीण भागातील इतर कुटुंबांसाठीही प्रेरणादायी ठरणारा आहे. जालना जिल्ह्यासह राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पाच हजार रुपयांची अग्रीम मदत, पीक नुकसानभरपाई, पीक कर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीला स्थगिती, शैक्षणिक शुल्कात सवलत आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा उपाययोजनांचा त्यात समावेश आहे.

याशिवाय दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी कुटुंबांतील मुलींचे विवाह आर्थिक अडचणींमुळे रखडू नयेत, यासाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला आहे. महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन, विद्यार्थिनींना सायकली आणि गरजू कुटुंबांना दिवाळीचा शिधा देण्याचे उपक्रमही राबविण्यात येत आहेत.

भाऊबीजेच्या निमित्ताने तांगडे कुटुंबातील मंदाबाई यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे औक्षण केले. यावेळी त्यांनी कुटुंबातील सदस्यांना कपडे भेट दिले. तांगडे कुटुंबीयांनीही त्यांना ज्वारी, बाजरी आणि छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन आपुलकी व्यक्त केली. शासनातील वरिष्ठ पदावरील व्यक्तीने आपल्या घरी येऊन सुख-दुःखाची विचारपूस केल्याने समाधान वाटत असल्याची भावना अंबादास तांगडे यांनी व्यक्त केली.

दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी कुटुंबाला केवळ आर्थिक मदतीची नव्हे, तर मानसिक आधाराचीही गरज असते. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भिलपुरीतील तांगडे कुटुंबाच्या भेटीदरम्यान शिक्षण आणि विवाहाची जबाबदारी स्वीकारण्याची घोषणा ही अशाच सामाजिक संवेदनशीलतेचे उदाहरण ठरली आहे. मुलीच्या पोलीस अधिकारी होण्याच्या स्वप्नाला मिळालेला आधार हा तिच्या भविष्यासाठी आशादायी ठरणारा आहे.

दुष्काळात जगायचे कसे? त्यात मायक्रो फायनान्सचा वसुलीचा तगादा; युवासेना आक्रमक!

मंठा । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतीचे झालेले नुकसान, रोजगाराचा अभाव, उत्पन्नात झालेली घट आणि वाढती महागाई यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा बिकट परिस्थितीतही मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून कर्जाच्या हप्त्यांच्या वसुलीसाठी नागरिकांकडे तगादा लावला जात असल्याचा मुद्दा उपस्थित करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या युवासेनेच्या वतीने आज मंठा तहसीलदार सुमन मोरे यांना निवेदन सादर करण्यात आले.

दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीचा अतिरिक्त आर्थिक आणि मानसिक ताण सहन करावा लागत आहे. वसुलीच्या नावाखाली नागरिकांना मानसिक त्रास देणे, महिलांशी अपमानास्पद वर्तन करणे किंवा त्यांच्यावर दबाव आणणे, असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. दुष्काळी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शेतकरी, शेतमजूर, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांची सुरू असलेली मायक्रो फायनान्स कर्जवसुली तात्काळ स्थगित करावी. तसेच संबंधित वित्तीय कंपन्यांच्या वसुली प्रतिनिधींकडून नागरिकांना त्रास होणार नाही, यासाठी प्रशासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.



प्रशासनाने दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा!

या गंभीर प्रश्नावर प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन पीडित नागरिकांना दिलासा द्यावा. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही युवासेनेच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी युवासेना तालुका प्रमुख डिगांबर बोराडे, शिवसैनिक प्रल्हाद सिरसाठ, रज्जाक शेख, युवासेना उपतालुका प्रमुख भागवत चव्हाण, अशोक घारे, बाळासाहेब बोराडे यांच्यासह आदी शिवसैनिक व युवासैनिक उपस्थित होते.

शासकीय मुलांच्या निरीक्षणगृहात बालकांसोबत दिवाळी साजरी

दिवाळीनिमित्त फराळ, मिठाई व नवीन कपड्यांचे वाटप

जालना । प्रतिनिधी

जालना येथील शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृहात सोमवार, दि.९ नोव्हेंबर रोजी मान्यवर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बालकांसोबत दिवाळी सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बालकांना फराळ, मिठाई तसेच नवीन कपडे व ड्रेसचे वाटप करण्यात आले. प्रभारी जिल्हाधिकारी रमेश जी. मिसाळ, बाल न्याय मंडळाचे प्रमुख दंडाधिकारी पुंड आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजेंद्र कड यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रभारी जिल्हाधिकाऱ्यांनी बालकांना नवीन कपडे व ड्रेस देऊन त्यांच्याशी संवाद साधला. बालकांना प्रेम, आपुलकी आणि सुरक्षिततेची जाणीव करून देणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे बालकांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान दिसून आले. तसेच बालगृहाचे अधीक्षक विजय विधे यांनी अनाथ, निराधार, निराश्रित व काळजी-संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठी उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती मान्यवरांना दिली. संस्थेच्या कार्याबद्दल मान्यवरांनी समाधान व्यक्त करून आभार मानले.यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, परिविक्षा अधिकारी, शिक्षक, जिल्हा बाल संरक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

माहेश्वरी समाजाचा दीपावली स्नेहमिलन व अन्नकूट सोहळा उत्साहात संपन्न

जालना । प्रतिनिधी

जालना माहेश्वरी समाजाच्या वतीने आयोजित दीपावली स्नेहमिलन व अन्नकूट सोहळा ज्वाला लॉन्स येथे उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याला समाजातील महिला, पुरुष, युवक-युवती तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ज्वाला लॉन्स पूर्णपणे भरले होते. स्नेह, एकोपा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणाऱ्या या सोहळ्याने दीपावलीच्या आनंदात आणखी भर घातली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी हैदराबाद येथील प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध मोटिव्हेशनल स्पीकर व काउन्सिलर डॉ. अनुराधा जाजू यांच्यासह संजय दाड, रामनिवास मानधानी, दामोदर बजाज, सौ. नूतन दाड, विजय गो. राठी, उमेश बजाज, सौ. कल्पना मुंदडा, प्रसाद भुतडा आणि कु. श्वेता बागडी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी यांनी केले. दीपावली स्नेहमिलनाच्या माध्यमातून समाजातील बंधुभाव, एकोपा आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी सांगितले. समाजाच्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी दिवंगत समाजबांधवांना विनोद बियाणी यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर रामनिवास मानधानी, संजय दाड आणि दामोदर बजाज यांनी उपस्थितांना दीपावलीच्या शुभेच्छा देत मनोगत व्यक्त केले. समाजाची एकजूट, संस्कार, परंपरा आणि नव्या पिढीचा सहभाग यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. अमोल बांगड यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रुपाली मुंदडा आणि सौ. सरिता मोदानी यांनी केले, तर उमेश बजाज यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमानंतर सर्व समाजबांधवांसाठी अन्नकूट व भोजनप्रसादीचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांनी एकत्रितपणे भोजनप्रसादीचा लाभ घेत दीपावलीचा आनंद द्विगुणित केला.



शांततापूर्ण आणि संस्कारक्षम कुटुंबासाठी डॉ. अनुराधा जाजू यांचा '-इउ फॉर्म्युला'

कुटुंबात स्वीकार, कौतुक आणि प्रभावी संवाद असेल तर अनेक समस्या सहज सुटू शकतात - डॉ. अनुराधा जाजू यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मांडले मार्गदर्शनपर सत्रात हैदराबाद येथील सुप्रसिद्ध मोटिव्हेशनल स्पीकर व काउन्सिलर डॉ. अनुराधा जाजू यांनी माहेश्वरी समाजातील सामाजिक प्रश्न, कौटुंबिक नातेसंबंध, नव्या पिढीचे प्रश्न आणि संस्कारांचे महत्त्व यावर परखड व प्रेरणादायी विचार मांडले. शांततापूर्ण, आनंदी आणि संस्कारक्षम कुटुंब निर्माण करण्यासाठी त्यांनी '-इउ फॉर्म्युला' उपस्थितांसमोर मांडला.

या फॉर्म्युल्यातील 'A' म्हणजे Acceptance and Appreciation अर्थात स्वीकार आणि कौतुक. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, विचार आणि वेगळेपणा स्वीकारणे तसेच त्याच्या चांगल्या गुणांचे आणि छोट्या-छोट्या प्रयत्नांचे मनापासून कौतुक करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणे देत त्यांनी स्पष्ट केले की, कुटुंबातील सदस्यांना समजून घेणे आणि त्यांच्या चांगल्या गोष्टींची दखल घेणे यामुळे नात्यांमधील जिव्हाळा वाढतो.

नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यासाठी दुसऱ्याची वाट पाहण्यापेक्षा स्वतःपासून सुरुवात करणे महत्त्वाचे आहे. बदलाची अपेक्षा इतरांकडून करण्याऐवजी स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणावा. स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मविश्वासाने पुढाकार घेतल्यास अनेक नवीन संधी निर्माण होऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. आयुष्यातील अनेक गैरसमज, मतभेद आणि कौटुंबिक समस्या योग्य संवादाअभावी निर्माण होतात. मनातील भावना, अपेक्षा आणि अडचणी योग्य पद्धतीने एकमेकांपर्यंत पोहोचवल्यास अनेक प्रश्न सहज सुटू शकतात. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, समजून घेणे आणि मोकळेपणाने संवाद साधणे ही सुखी कुटुंबाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सांगितले.

समाजाची खरी ताकद केवळ आर्थिक संपन्नतेत नसून परस्परांतील आपुलकी, विचारांची समृद्धी आणि सामाजिक एकतेत असते, या सोहळ्याच्या यशस्वितेसाठी जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुंदडा, अतुल लड्ढा, अरुण लाहोटी, साईप्रसाद मालपाणी, कोषाध्यक्ष विनोद बियाणी, संघटन मंत्री शामसुंदर लखोटिया, सहसचिव प्रा. स्वप्नील सारडा, सहकोषाध्यक्ष अमोल बांगड, संयुक्त मंत्री सतीश राठी, शिवप्रसाद गट्टाणी, जनसंपर्क मंत्री सुनील रा. बियाणी, राजेंद्र आर. मंत्री आणि सहजनसंपर्क मंत्री महेश सारडा यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच कार्यकारिणी सदस्य डॉ. अरविंद झंवर, संतोष करवा, रामनिवास मुंदडा, प्रकाश राठी, रामेश्वर मुंदडा, बालाप्रसाद तोष्णिवाल, डॉ. आशुतोष सोनी, शिवप्रसाद नावंदर, दत्तप्रसाद लड्ढा, बजरंग भक्कड, ललित चेचाणी, आशिष राठी, राजेश बियाणी, दीपेश करवा, ओमप्रकाश सेठी, निलेश लखोटिया, द्वारकादास मुंदडा, सौरव साबू, राजेश गिलडा, रामेश्वर राधाकिशन मुंदडा यांच्यासह सर्व प्रभागांचे कार्यकारिणी सदस्य, किशोरी मंडळ आणि सखी-सहेली माहेश्वरी महिला मंडळ यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोलाचे योगदान दिले. दीपावलीच्या मंगलमय वातावरणात पार पडलेल्या या स्नेहमिलन सोहळ्यामुळे समाजातील स्नेहबंध अधिक दृढ झाले. डॉ. अनुराधा जाजू यांच्या -इउ फॉर्म्युल्यातून मिळालेला कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचा संदेश तसेच अन्नकूटाच्या माध्यमातून अनुभवलेला सामूहिक आनंद यामुळे हा सोहळा सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.१४ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



लातूर शहर व ग्रामीण भागातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहून न्याय देण्याचे काम करु : माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर । प्रतिनिधी

जिल्ह्यात पुरेशा पावसाअभावी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि कष्टकरी जनतेसमोर अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. अनेक नागरिकांचे रेशन बंद झाले आहे, दोन वर्षांपासून पीकविम्याची रक्कम रखडलेली आहे, मराठवाड्याचा अनुशेष रखडलेला आहे, शेतकर्यांच्या ऊसतोडीचा प्रश्न मार्गी लागत नाही. तसेच लातूर शहरातील पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून दर आठ दिवसाला लातूकरांना पाणी मिळत आहे. जानेवारीत दुष्काळाची तिव्रता व पाण्याचा आणखी प्रश्न गंभीर होणार असल्यामुळे जिल्हा प्रशासनाने पूर्व नियोजन करून टंचाई परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे तर दुसरीकडे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही गंभीर बनला असून चोरी, अवैध धंदे, मारामारी आणि खुनासारख्या घटनांमध्ये वाढ होत आहे. प्रशासनाच्या प्रभावी नियंत्रणाअभावी सर्वसामान्य नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे लातूर शहर व ग्रामीण भागातील दुष्काळग्रस्त शेतकर्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना न्याय देण्याचे काम करू असे प्रतिपादन जननायक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी



आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

जननायक संघटनेच्या कार्यकारिणी समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, जिल्हा कार्याध्यक्ष बी.टी. कदम, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब देशमुख, सुभाषअप्पा सुलगुडले, तानाजी झुंजे पाटील, बालाजी शेळके, राजाभाऊ मुळे, प्रतापराव शिंदे, उद्धवराव जाधव, कमलाकर कदम, माधवराव गायकवाड, वीरभद्र चिकटे, दत्तात्रय वलाकट्टे, सचिन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, जननायक संघटनेचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी नवीन कार्यकारिणीचा विस्तार करण्यात येणार आहे. यासाठी लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील लोकप्रतिनिधी आणि विद्यमान पदाधिकार्यांनी समन्वय साधून नवीन पदाधिकार्यांच्या निवडीसाठी याद्या तयार कराव्यात. लातूर ग्रामीण प्रमुख, महिला आघाडी प्रमुख तसेच युवा आघाडी प्रमुखांच्या निवडीसाठी सर्कलनिहाय बैठका घेऊन पदाधिकार्यांशी संवाद साधण्यात येणार आहे. संघटनेची व्याप्ती वाढविण्यासोबतच सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल. याशिवाय लातूर शहरातील वाहतूक कोंडी, बंद पडलेले सिग्नल आणि शहरातील रस्ते व इतर नागरी समस्यांच्या निराकरणासाठीही संघटना प्रयत्नशील राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ऊसतोडीचा प्रश्न सोडविण्यासाठी जननायक संघटना प्रयत्नशील राहणार : बाबासाहेब देशमुख

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याअभावी शेतातील ऊस वाळून जात आहे. मात्र, कारखानदारांकडून नियोजित तारखेनुसारच ऊसतोड केली जात असल्याने अनेक शेतकर्यांचा ऊस शेतातच उभा राहून वाळत आहे. यासंदर्भात साखर कारखाना प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही ऊसतोडीचा प्रश्न मार्गी लागत नसल्याने शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. शेतकर्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जननायक संघटनेच्या माध्यमातून प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब देशमुख यांनी केले.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक मतदान केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

लातूर । प्रतिनिधी

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक २०२६ करिता रविवार, १५ नोव्हेंबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यातील औसा, रेणापूर, निलंगा, शिरूर अनंतपाळ, देवणी, अहमदपूर, चाकूर व जळकोट येथील तहसील कार्यालयांमध्ये तसेच उदगीर येथील प्रशासकीय भवन इमारतीच्या तळमजल्यावरील खोली क्रमांक २ अशा एकूण दहा मतदान केंद्रांवर ही मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

या आदेशानुसार, १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून ते मतदानाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मतदान केंद्रांच्या ठिकाणापासून २०० मीटरच्या परिसरात पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. या २०० मीटरच्या प्रतिबंधित क्षेत्रातील सर्व राजकीय पक्षांची कार्यालये, मंडप आणि सर्व दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असून सर्व प्रकारचे फेरीवाले, खाजगी वाहने तसेच मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. यासोबतच मतदान केंद्रांच्या परिसरात ध्वनिक्षेपकांचा वापर करणे, वाद्य वाजविणे आणि मिरवणुका काढण्यासही प्रतिबंध करण्यात आला आहे.

निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी यांना या आदेशातून वगळण्यात आले असून त्यांच्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला वैध ओळखपत्राशिवाय मतदान केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

सैराट फेम तानाजी गळगुंडे आणि संपादक कोंडिराम काळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

लातूर । प्रतिनिधी



मराठी चित्रपटसृष्टीतील गाजलेल्या 'सैराट' चित्रपटातून घराघरात पोहोचलेले प्रसिद्ध अभिनेते तानाजी गळगुंडे आणि 'बातमी पुढची बातमी'चे संपादक कोंडिराम काळे यांचा वाढदिवस दत्ता जवळगे यांच्या वतीने मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने आयोजित एका छोटेखानी पण स्नेहपूर्ण कार्यक्रमात केक कापून दोघांनाही वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. दत्ता जवळगे यांनी तानाजी गळगुंडे आणि कोंडिराम काळे यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी आणि उत्तम आरोग्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. या सोहळ्याला मित्रपरिवार, चाहत्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सर्व उपस्थितांनीही या दोघांवर शुभेच्छांचा वर्षाव केला.

दुष्काळी परिस्थितीतही दिवाळीत प्रदूषणाचा धुरळा!

उदगीर । पाटील मनेश

यावर्षी संपूर्ण पावसाळ्याच्या काळात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी होते. दरवर्षीप्रमाणे पाऊस पडला असता तर हवेतील धुळीचे प्रमाण कमी राहिले असते, मात्र पाऊस कमी असतानाही नागरिकांनी मोठ्या प्रमाणात फटाके फोडल्याने उदगीर शहरात हवेचे आणि ध्वनीचे प्रदूषण वाढल्याचे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या सर्वेक्षणात समोर आले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण शास्त्रविभाग प्रमुख प्रा. डॉ. जयप्रकाश पटवारी त्यांचे सहकारी रोशनी उगीले आणि मनोहर नावंदे यांनी लक्ष्मीपूजन ते दिवाळी पाडवा या तीन दिवसांत शहरातील विविध ठिकाणी हे सर्वेक्षण केले. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हवा गुणवत्ता निर्देशांक १०५ तर ध्वनी पातळी १२० डेसिबल नोंदवली गेली. दुसऱ्या दिवशी हवा गुणवत्ता निर्देशांक ११५ तर ध्वनी पातळी ११५ डेसिबल होती. दिवाळी पाडव्याच्या दिवशी हवा गुणवत्ता निर्देशांक १२५ वर पोहोचला तर ध्वनी पातळी ११० डेसिबल इतकी होती. हवा गुणवत्ता निर्देशांक मध्यम प्रदूषण श्रेणीत असला तरी ध्वनी प्रदूषण अत्यंत धोकादायक श्रेणीत होते. ८५ डेसिबल पेक्षा जास्त आवाज हा कान आणि हृदयासाठी घातक मानला जातो. उदगीरमध्ये ११० ते १२० डेसिबल पर्यंत आवाजाची नोंद झाली, ही बाब चिंताजनक आहे. पावसाअभावी हवेतील प्रदूषक कण तसेच राहिल्याने लहान मुले, वृद्ध, दमा आणि हृदयरुग्णांना अधिक त्रास झाला. पर्यावरणशास्त्र विभागाने पुढील वर्षी कमी आवाजाचे फटाके वापरून आणि दिव्यांची रोषणाई करून पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे.

भादा..शिवली रस्त्याचे भिजत घोंगडे, गाव विकासाचे कर्तत्व पडले उघडे..?

औसा । बी.डी. उबाळे

तालुक्यातील भादा ते शिवली हा रस्ता सध्या मोठ्या प्रमाणात बहुचर्चित असून या रस्त्याच्या कामाचे भिजत घोंगडे गेल्या एक वर्षापासून पडल्याने गाव विकासाचे कर्तृत्व पडले उघडे असे म्हणण्याची वेळ सध्या भादेक्रावर आली असून हा रस्ता गेल्या एक वर्षापासून पेंडिंग पडला असून या रस्त्याकडे वारंवार शासनाकडे प्रशासनाकडे आणि स्थानिक पुढाऱ्याकडे चकरा मारून शेतकऱ्यांचा मोठा वेळ वाया गेला आणि रस्ता प्रगतीच्या कामाला वेग नाही आला. दिवाळीपूर्वी संबंधित शेतकरी आणि भादा तालुका औसा येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल शहाणे यांच्या मध्यस्थीने या रस्त्याचा तोडगा



काढण्याचा प्रयत्न केला आणि तो बोलणी मध्ये तरी यशस्वी ही झाला. आणि दिवाळी संपल्यानंतर सदरील गुत्तेदाराच्या कामावर मजूर उपलब्ध नसल्याने ते दिवाळीनंतर काम सुरू करतो असे त्यांनी सांगितले होते परंतु दिवाळी संपूनही गेली तरीही काम सुरू झाले नाही. त्यामुळे सदरील रस्त्यावरील शेतकऱ्यांमध्ये या कामाविषयी काम सुरू करणे विषयी चर्चा सुरू झाली असून सदरील काम हे त्वरित सुरू करणे आवश्यक आहे. कारण हा रस्ता काम सुरू होऊन जवळपास अंदाजे दोन वर्ष पूर्ण होत आहेत तरीही हा रस्ता वापरा योग्य न झाल्याने आणि अद्याप पर्यंत या रस्त्याला पर्यायी मार्ग न दिल्याने त्या ठिकाणाहून जात असताना तो रस्ता सध्या धोकादायक स्थितीमध्ये असून किरकोळ ते गंभीर जखमी सतत नागरिक आणि शेतकरी होताना दिसत आहे. तर याच ठिकाणी जवळपास एक किमी अंतरापर्यंत इतरही काही शेतकऱ्यांनी विनाकारण रस्ता अडवणूक केल्याने त्या रस्त्यावरून वाहतूक करणारी शेतकरी नागरिक आणि शिवली, वरवडा तसेच धाराशिव या राज्य मार्गाला जोडणारा हा रस्ता असल्याने हा अत्यंत उपयुक्त रस्ता आहे तरी हा रस्ता त्वरित काम सुरू होऊन काम पूर्ण होणे आवश्यक असल्याचे मत शेतकऱ्याकडून व्यक्त केले जात आहे.

तर सध्या सोशल मीडियावर रस्ता आडवणाराची खैर नाही ? ही पोस्ट फिरत असतानाच शासन नवनवीन नियम काढत आहेत. परंतु हा रस्ता पारंपारिक रित्या वापरात असलेला असतानाही या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अडवणूक का केली जाते? याचे संशोधन होणे आवश्यक आहे आणि हा रस्ता त्वरित काम सुरू करून पूर्ण करावा अशी मागणी या भागातील शेतकऱ्याकडून केली जात आहे.

वैद्यकीय रजेवरील पोलीस अंमलदाराकडून झालेल्या गैरवर्तनाची पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्याकडून गंभीर दखल; कठोर विभागीय कारवाईची प्रक्रिया सुरू

लातूर । प्रतिनिधी

पोलीस गणवेशाचा अवमान करून पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणाऱ्या बेशिस्त वर्तनाची लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी गंभीर दखल घेतली आहे. पुणे रेल्वे स्टेशन परिसरात गणवेशात मद्यप्राशन करून झोपलेल्या अवस्थेत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याप्रकरणी लातूर पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणपत गोपीनाथ पवार यांच्याविरुद्ध कठोर विभागीय कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणपत गोपीनाथ पवार हे लातूर पोलीस मुख्यालय येथे नेमणुकीस असून, दिनांक ०३ नोव्हेंबर २०२६ पासून वैद्यकीय रजेवर आहेत. दिवाळीनिमित्त ते पुणे येथे आपल्या कुटुंबीय व नातेवाईकांकडे गेले होते. याचदरम्यान पुणे रेल्वे स्टेशन परिसरात गणवेशात मद्यप्राशन करून झोपलेल्या अवस्थेत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाला. सदर व्हिडिओची माहिती नियंत्रण कक्षामार्फत प्राप्त झाल्यानंतर त्याची खातरजमा करण्यात आली. संबंधित अंमलदाराने मद्यार्क सेवन केल्याची बाबही समोर आली आहे. याबाबतीत चा रेल्वे पोलिसांकडून अहवाल प्राप्त झालेला आहे.

पोलीस गणवेश हा केवळ वस्त्र नसून तो कायद्याचे रक्षण, शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि जनतेच्या विश्वासाचे प्रतीक आहे. अशा गणवेशात मद्यप्राशन करून सार्वजनिक ठिकाणी बेशिस्त वर्तन करणे ही पोलीस दलाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचवणारी गंभीर बाब आहे. प्रत्येक अधिकारी व अंमलदाराने आपल्या वर्तनातून पोलीस दलाची प्रतिमा आणि प्रतिष्ठा जपणे अपेक्षित आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली असून, संबंधित सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाच्या बेशिस्त वर्तनाबाबत नियमानुसार कठोर विभागीय कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. लातूर पोलीस दलात शिस्त आणि कर्तव्यनिष्ठेला सर्वोच्च प्राधान्य असून, गणवेशाचा अवमान करणारे किंवा पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणारे कोणतेही बेशिस्त वर्तन खपवून घेतले जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात येत आहे.

ग्राम विकास मंच, गुडसूर तर्फे इंजिनिअर कृष्णा मुस्कावाडचा सत्कार संपन्न

उदगीर । पाटील मनेश



'ग्राम विकास मंच, गुडसूर' ता. उदगीर यांच्या वतीने गावचे सुपुत्र एलटीएम कंपनी बेंगलोर येथे इंजिनिअर म्हणून निवड झाल्याबद्दल कृष्णा मुस्कावाड यांचा सत्कार मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात विचारमंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी सरपंच तथा आदर्श शेतकरी राजेंद्र मुडपे तर प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध कृषी तज्ज्ञ उदय देवळाणकर, आदर्श शेतकरी व्यंकटराव देमगुंडे, इंजिनिअर अजय मुडपे, प्रसिद्ध साहित्यिक धनंजय गुडसूरकर हे उपस्थित होते.

कृष्णा मुस्कावाड यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामस्थांच्या वतीने स्मृतिचिन्ह, शाल व बुके देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना प्रसिद्ध कृषी तज्ज्ञ उदय देवळाणकर म्हणाले, कृष्णा मुस्कावाड यांच्या जिद्द आणि मेहनतीमुळे हे यश मिळाले आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन त्यांनी इंजिनिअरिंग क्षेत्रात मिळवलेले यश हे गावातील इतर तरुणांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे .

सत्काराला उत्तर देताना इंजिनिअर कृष्णा मुस्कावाड यांनी ग्राम विकास मंच आणि सर्व ग्रामस्थांचे आभार मानले. गावाच्या विकासासाठी आणि येथील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध राहू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपक्रमशील सहशिक्षक बाळू तोटकर यांनी केले तर प्रमुख पाहुणे यांचा परिचय प्रसिद्ध साहित्यिक धनंजय गुडसूरकर यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनसीसी प्रमुख डॉ बालाजी मुस्कावाड व प्रा धनराज बंडे यांनी केले तर आभार प्रा. कुमार बंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्राम विकास मंचच्या सभासदांनी सहकार्य केले.

भाशिप्र संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शास्त्री शैक्षणिक संकुलात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न

शाळेतील आठवणीने माजी विद्यार्थ्यी भावूक

उदगीर । पाटील मनेश



भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शास्त्री शैक्षणिक संकुलात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा मोठ्या उपस्थितीत संपन्न झाला. अनेकविध क्षेत्रातील माजी विद्यार्थी या मेळाव्याला उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, प्रमुख पाहुणे संतोष कुलकर्णी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासूणे, सतनप्पा हूरदळे, व्यंकटराव गुरमे, ड. शिवाजीराव बिराजदार, चंद्रकांत धनबा, अमोल निडवदे, विशाल तोंडचिरकर, अंकुश मिरगुडे, वसंत वाघमारे उपस्थित होते.

याप्रसंगी शाळेचे माजी विद्यार्थी अमोल निडवदे व शांती सोनटक्के यांनी आपल्या शालेय जीवनातील काही प्रसंग सांगून आठवणींना उजाळा दिला. गतकाळातील शालेय जीवनातील आठवणीचा भाग म्हणून अनेक खेळ घेण्यात आले. त्यात माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन आनंद वाढवला. माजी शिक्षक उमाकांत कोनाळे यांनी बदलत्या शैक्षणिक परिस्थितीवर भाष्य केलं. प्रमुख पाहुणे संतोष कुलकर्णी यांनी सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, स्वबोध, नागरी कर्तव्य, पर्यावरण संवर्धन या पंच परिवर्तनावर कार्य करण्याचे आवाहन माजी विद्यार्थ्यांना केले.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी बालासाहेब केंद्रे यांनी शाळेने दिलेले संस्कार न विसरता माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता येलमटे प्रास्ताविक नीता मोरे स्वागत व परिचय निलेश मांडवकर वैयक्तिक गीत वसंत वाघमारे तर आभार अंकुश मिरगुडे यांनी मानले. प्रीती शेंडे यांच्या कल्याण मंत्रानी कार्यक्रमाची सांगता झाली.

मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख सुप्रिया बुधे, माधव मठवाले, पर्यवेक्षक कृष्णा मारावर, किरण नेमट, तानाजी खोकले, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख लक्ष्मी चव्हाण, निलेश मांडवकर व सर्व माजी विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

प्रा.डॉ. आलापुरे यांना यंग सायंटिस्ट अवॉर्ड इन बॉटनी प्रदान

उदगीर । पाटील मनेश



महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आलापुरे राहुल बाबुराव यांना प्रतिष्ठेचा यंग सायंटिस्ट अवॉर्ड इन बॉटनी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत हा पुरस्कार संयुक्तपणे प्रदान करण्यात आला. ही उच्चस्तरीय जागतिक परिषद सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च, दिल्ली, हार्वेस्ट हार्मोनिक्स (यूएसए), सदर्न फेडरल युनिव्हर्सिटी (रशिया), मल्ला रेड्डी युनिव्हर्सिटी (हैदराबाद), आयसीआरआयएसएटी (हैदराबाद) यांच्या संयुक्त विद्यमाने ॲडव्हान्सेस इन ॲग्रिकल्चरल टेक्नॉलॉजी अँड अलाईड सायन्सेस या विषयावर आयोजित करण्यात आली होती.

वनस्पतीशास्त्र क्षेत्रातील त्यांचे उत्कृष्ट योगदान, संशोधनातील उत्कृष्टता आणि समर्पण यासाठी डॉ. आलापुरे यांना हे आंतरराष्ट्रीय मानांकन मिळाले आहे. या यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.१४ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

वाघोली येथे शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या; गावात पसरली शोककळा

औसा । बी.डी. उबाळे

औसा तालुक्यातील मौजे वाघोली येथे एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी घडली. हणमंत जनार्धन पवार (वय ४९ वर्षे) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.



याबाबत स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पवार यांनी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या दरम्यान स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन जीवन संपवले. या घटनेची माहिती समजताच गावामध्ये आणि परिसरात शोककळा पसरली. हणमंत पवार यांच्या पश्चात वडील, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

या घटनेमुळे पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून वाघोली गावासह परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. सदरील घटनेबाबत मृत्यूचे कारण स्पष्ट झाले नसून पुढील तपास औसा पोलीस करीत आहेत.

हजारो दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघाली चालुक्य कालीन येरगी नगरी; पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्याचे केले संकल्प

देगलूर । अजीम अन्सारी

दिवाळीनिमित्त देगलूर तालुक्यातील येरगी येथे काल १० नोव्हेंबर रोजी दिवाळी पाडवा व बलिप्रतिपदा निमित्त चालुक्य कालीन सरस्वती मंदिर, शिवमंदिर, हनुमान मंदिर, सोमलिंग मंदिर, व बारव व परिसरात गावातील सर्व महिला – पुरुषांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत हजारों दिवे लावून दिवाळी साजरी केली. हजारो दिव्यांच्या लख्ख प्रकाशात संपूर्ण परिसर उजळून निघाले होते.

चालुक्य कालीन नगरी येरगी चे आदर्श व्यक्तिमत्व संतोष पाटील यांच्या संकल्पनेतून ग्राम पंचायत कडून दीपावली निमित्त सर्व गावकऱ्यांच्या आरोग्यासाठी, गावच्या विकासासाठी हा दीपोत्सव मागील चार वर्षापासून आयोजित करण्यात येत आहे. यावेळी सर्वांनी गावाच्या सुखसमृद्धी साठी देवाची प्रार्थना केली. देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन येरगी गावच्या इतिहासात मागील चार वर्षापासून सामूहिक दीपावली साजरी करत आहेत. यात गावातील सर्व महिला पुरुष, दिवाळीनिमित्त माहेरी आलेल्या नवविवाहित महिला उत्साहात सहभागी होतात.

विशेषतः महिलांनी मातीचे दिवे आणि गव्हाच्या पिठापासून दिवे बनवून आणले होते. प्रत्येक महिलांनी जवळपास १०१ दिवे आणले होते. ज्यातून पर्यावरणाची जोपासना करण्याचे संकल्प करण्यात आले. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी हजारो मातीच्या दिव्यांनी गावातील सर्व चालुक्य कालीन मंदिरे दिव्यांच्या पवित्र प्रकाशक न्हाऊन निघाले होते. अशा हजारो दिव्यांनी गावातील सरस्वती मंदिर, मारुती मंदिर, चालुक्य कालीन शिवमंदिर, सोमलिंग मंदिर, बारव परिसर लख्ख प्रकाशात न्हाऊन निघाले होते. या विलोभनीय दृश्याचे साक्षीदार होण्याचे भाग्य आम्हाला लाभले असे गावातील ज्येष्ठांनी भावोद्गार काढले. आणि ग्राम पंचायत कडून आयोजित केलेल्या या अनोख्या उपक्रमाचे कौतुक केले. या दीपोत्सवात गावातील सर्व कुटुंबातील सदस्य सामील झाले होते.या दीपोत्सव आयोजनामागे पर्यावरणाची जोपासना, ऐतिहासिक संपदेचे जपवणूक व दिवाळीची भारतीय परंपरा आणि संस्कृती टिकवणे असा उद्देश असल्याचे सरपंच संतोष पाटील यांनी सांगितले.

दीपोत्सव दरम्यान शांतता प्रस्थापित करण्यासाठी या प्रसंगी पोलिस निरीक्षक आर.एम.हुंडेकर, देगलूर भूमिपुत्र तहसीलदार योगेश टोपे, जेष्ठ पत्रकार गौतम बनसोडे, महिला रोग तज्ञ डॉ.पुजा गायकवाड मेदनकल्लुरचे पोलिस पाटील शिवकुमार जाधव, सौ. राजकन्या नागोरी राम येरगीकर, विजय बरसमवार, आदींची उपस्थिती होती. सुत्रसंचालन डॉ. सुनील जाधव यांनी केला, आभार संतोष पाटील येरगीकर यांनी मानले. या दीपोत्सवात आयोजक सरपंच संतोष पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट, सर्व ज्येष्ठ नागरिक, आजी माजी सरपंच, पदाधिकारी, तंटामुक्ती अध्यक्ष, दक्षता समिती, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष, सर्व, गावकरी, बालिका पंचायत राज समितीच्या पदाधिकाऱ्यांनी, संतोष पाटील मित्र मंडळ आदींनी मोठ्या संख्येने सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला.



बामणी बुद्रुक येथील मुस्लिम कब्रस्तानाच्या मूलभूत सुविधांसाठी प्रशासनाला जाग; ग्रामसेवकांकडून स्थळ पंचनामा!

हसन फाउंडेशनच्या तक्रारीची दखल; मकसूद पटेल लोहगावकर यांच्या उपस्थितीत पाहणी, गटविकास अधिकाऱ्यांकडे अहवाल सादर

बिलोली । प्रतिनिधी

बिलोली तालुक्यातील मौजे बामणी बुद्रुक येथील महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे नोंद असलेल्या 'छिल्ला खाकीशाह वली अँड ग्रेव्हयार्ड' या मुस्लिम कब्रस्तानासाठी कायमस्वरूपी प्रवेशरस्ता, संरक्षण भिंत, विद्युत खांब व प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या मागणीला प्रशासकीय पातळीवर हालचाल सुरू झाली आहे. हसन फाउंडेशन महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते मक्सूद पटेल लोहगावकर यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे केलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि.१३ नोव्हेंबर २०२६ रोजी ग्रामसेवक गवई यांनी कब्रस्तानाची प्रत्यक्ष स्थळपाहणी करून पंचनामा केला. सदर पंचनाम्याचा अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती बिलोली यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

बामणी बुद्रुक येथील मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानात अंत्यविधीसाठी जाण्याकरिता सुरक्षित व कायमस्वरूपी सार्वजनिक प्रवेशरस्त्याची सुविधा नसून कब्रस्तानाभोवती संरक्षण भिंत, विद्युत खांब व पुरेशी प्रकाशव्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे तक्रार निवेदनात नमूद करण्यात आले होते. विशेषतः पावसाळ्यात तसेच रात्रीच्या वेळी दफनविधीसाठी जाणाऱ्या नागरिकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याने या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर ग्रामसेवक गवई यांनी मकसूद पटेल लोहगावकर यांच्या उपस्थितीत कब्रस्तान परिसराची पाहणी करून स्थळ पंचनामा केला. यावेळी गणीसाब शेख, रज्जाकसाब शेख, स. अहमद, सय्यद अशफाक, सय्यद मुश्ताक, मोझ्झ साब यांच्यासह गावातील अन्य नागरिक उपस्थित होते. दरम्यान, कब्रस्तानासाठी कायमस्वरूपी सिमेंट काँक्रीट प्रवेशरस्ता, संरक्षण भिंत तसेच विद्युत व प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, आवश्यक निधीची तरतूद करावी आणि कामांना प्रशासकीय मंजुरी देऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी मागणी हसन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. आता स्थळ पंचनामा होऊन अहवाल गटविकास अधिकाऱ्यांकडे सादर झाल्यानंतर प्रशासन या प्रश्नावर कोणता निर्णय घेते आणि कब्रस्तानाच्या मूलभूत सुविधांसाठी निधी व मंजुरीची प्रक्रिया किती वेगाने पुढे नेते, याकडे बामणी बुद्रुक येथील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

आठवडी बाजारातील कचऱ्याला आग; झाडे जळाल्याचा पर्यावरणमित्र मधुकर चटप यांचा आरोप

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथील आठवडी बाजार परिसरात पर्यावरणाच्या दृष्टीने लावण्यात आलेल्या झाडांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात घाण व प्लास्टिक कचरा टाकला जात असल्याचा आरोप पर्यावरणमित्र मधुकर चटप यांनी केला आहे. बाजारातील साचलेला कचरा उचलून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याऐवजी तो पेटवून दिल्याने परिसरातील झाडे जळाल्याचे त्यांनी सांगितले.



ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी आज बाजार परिसरातील कचरा पेटवून दिल्यामुळे लावलेली काही झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याचा आरोप चटप यांनी केला आहे. विशेषतः झाडांच्या जवळच प्लास्टिक कचरा जाळल्याचे दिसून येत असून, प्लास्टिक कचरा न उचलता तो झाडांच्या परिसरात जाळल्याने पर्यावरणासह वृक्षांचेही मोठे नुकसान होत असल्याचे त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून सांगितले. आठवडी बाजारात व्यापाऱ्यांनी कचरा कुठेही न टाकता त्याची योग्य विल्हेवाट लावावी, तसेच ग्रामपंचायतीने बाजार परिसरातील कचरा व्यवस्थापनाची प्रभावी व्यवस्था करावी, अशी मागणी पर्यावरणमित्र मधुकर चटप यांनी केली आहे.

ग्रामपंचायत कार्यालयासमोर पर्यावरण मित्र मंडळाची उपस्थिती

या प्रकाराच्या दि.१३ नोव्हेंबर रोजी सकाळी आखाडा बाळापूर पर्यावरण मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपस्थित राहावे, असे आवाहन पर्यावरणमित्र मधुकर चटप यांनी केले आहे. झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संगोपन व संरक्षण करण्याची जबाबदारीही प्रशासनाने गांभीर्याने घ्यावी. प्लास्टिक कचरा जाळण्याऐवजी त्याची योग्य विल्हेवाट लावावी, अन्यथा वृक्षारोपणाचा उद्देशच निष्फळ ठरेल, अशी भूमिका चटप यांनी व्यक्त केली आहे.

शिक्षणातून समाज प्रबोधनाला चालना देणारे शिक्षणतज्ञ मौलाना अबुल कलाम आझाद : प्राचार्य डॉ. कुलकर्णी

देगलूर । अजीम अन्सारी

शिक्षण हा समाज प्रबोधनाचा महत्त्वाचा घटक असून शिक्षणातूनच सामाजिक परिवर्तनाला योग्य दिशा मिळते या भूमिकेतूनच मौलाना अबुल कलाम आझाद यांनी स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून कार्यरत असताना शैक्षणिक प्रचार प्रसाराला चालना दिली होती, असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून दिनांक ११ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय शिक्षण दिन कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते.यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. दिगंबर कुलकर्णी, प्रा. अनिल ठोसरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, स्वातंत्र्यलढ्यातील ही विविध आंदोलनात मौलाना अबुल कलाम आझाद यांचा सहभाग लक्षणीय स्वरूपाचा राहिलेला आहे. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. दिगंबर कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन बी.ए. द्वितीय वर्षातील कु. भाग्यश्री माडपत्ते या विद्यार्थिनीने केले तर आभार बी.एस्सी. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कु.मंजुषा धर्मकारे यांनी मानले.

भरधाव कारच्या धडकेत २० वर्षीय युवक ठार; भावाच्या मृत्यूची बातमी ऐकताच बहिणीने प्यायले विष

उस्माननगर । प्रतिनिधी

मावशीला भेटून स्कुटीवरून गावी परतणाऱ्या महेश चावरे (वय २०, रा. मारतळा) याला भरधाव बोलेरो निओ कारने जोराची धडक दिली. या भीषण अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (ता. ११) भाऊबीजेच्या दिवशी दुपारी नांदेड-हैदराबाद महामार्गावरील हातणी फाट्यावर घडली. दरम्यान, भावाच्या मृत्यूची बातमी समजताच बहिण माधुरी हिने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. नातेवाइकांनी तिला तातडीने नांदेड येथील रुग्णालयात दाखल केले



असून तिची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

महेश हा डोणगाव येथे मावशीला भेटून स्कुटीवरून मारतळ्याकडे परतत असताना नांदेडहून नायगावकडे जाणाऱ्या बोलेरो निओ कारने त्याच्या एम.एच.२६.ए.क्यु.४७८६ स्कुटीला जोराची धडक दिली. यात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर कारचालक वाहनासह पसार झाला. मात्र, कुंभारगाव-वजीरगाव मार्गावर कार पंक्चर झाल्याने ती सोडून चालकाने पळ काढला. उस्माननगर पोलिसांनी कार ताब्यात घेतली असून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महेशचे वडील लहानपणीच वारल्याने आईने मोलमजुरी करून त्याचे शिक्षण पूर्ण केले होते. मोटार मेकॅनिकलचा डिप्लोमा पूर्ण करून त्याने एका कंपनीत अप्रेंटिसशिपही केली होती. दिवाळीनंतर तो नवीन नोकरीवर रुजू होणार होता. मात्र, काळाने घाला घातल्याने कुटुंबाचा एकुलता आधार हिरावला. या घटनेमुळे मारतळा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नांदेडच्या रुस्तुमजी वृद्धाश्रमात दीपावली आनंदमयी; देगलूरच्या गंगाधर भांगे यांच्यातर्फे ज्येष्ठ नागरिकांना वस्त्रदान



देगलूर । अजीम अन्सारी

सणासुदीच्या आनंदात समाजातील प्रत्येक घटकाला सहभागी करून घेत, नांदेड येथील 'रुस्तुमजी वृद्धाश्रमात' दीपावलीचा सण अत्यंत उत्साहात आणि आपुलकीने साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी देगलूर येथील सामाजिक कार्यकर्ते गंगाधर भांगे यांच्या सौजन्याने वृद्धाश्रमातील माता-भगिनींना साड्या आणि पुरुष आजी-आजोबांना नवीन ड्रेस (वस्त्र) भेट देण्यात आले.

या सत्कारमूर्तींचा आणि दानशूर व्यक्तींचा गौरव भारत पेट्रोलियम चे विभागीय अधिकारी संतोष कुमार यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किंवा प्रमुख उपस्थितीत संस्थेच्या सचिव श्रीमती सुरेखा पाटणी या ऑनलाईन माध्यमातून जोडल्या गेल्या होत्या. त्यांनी आपल्या मनोगतातून ज्येष्ठ नागरिकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि अशा उपक्रमांमुळे वृद्धाश्रमातील पालकांच्या चेहऱ्यावर येणारे हास्य हीच खरी दिवाळी असल्याचे सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे व मान्यवर म्हणून संस्थेचे व्यवस्थापक सुरेश करेवाड, स्टेट बँकेच्या सो. स्वरा मराठे आणि शेख खादिर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नवीन कपडे मिळाल्यामुळे वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या चेहऱ्यावर दीपावलीच्या निमित्ताने एक वेगळाच आनंद व समाधान पाहायला मिळाले. उपस्थित सर्वच उपस्थितांनी गंगाधर भांगे यांच्या या संवेदनशील आणि लोकोपयोगी उपक्रमाबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

काँग्रेस नेते जकी कुरेशी काँग्रेसला लवकरच 'जय महाराष्ट्र' करणार?

दिवाळी फराळाच्या कार्यक्रमात पक्षबदलाच्या चर्चांना उधाण; कोणत्या पक्षात जाणार याकडे सर्वांचे लक्ष

कळमनुरी । गंगासागर पंडित

तालुक्यातील आखाडा बाळापूर येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते म जकी कुरेशी हे काँग्रेस पक्षाला लवकरच 'जय महाराष्ट्र' करणार असल्याच्या चर्चांना सध्या राजकीय वर्तुळात उधाण आले आहे. त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत आता स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, ते नेमका कोणत्या पक्षात प्रवेश करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जकी कुरेशी हे शालेय जीवनापासून काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिलेले नेते म्हणून परिसरात परिचित आहेत. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख तसेच माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याशी त्यांचे जवळचे संबंध असल्याचे काँग्रेसच्या



स्थानिक वर्तुळात मानले जात होते. अशोकराव चव्हाण यांनी काँग्रेस पक्ष सोडून भाजपमध्ये प्रवेश केला, त्यावेळी म जकी कुरेशी हे देखील भाजपमध्ये प्रवेश करतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. मात्र, त्यावेळी त्यांनी काँग्रेसची साथ सोडली नाही. उलट काँग्रेस पक्षाला नव्या जोमाने उभारी देण्यासाठी त्यांनी काम सुरू ठेवले. काँग्रेस पक्षाची ध्येयधोरणे तसेच पक्षाची भूमिका वाडी-वस्ती, तांडे आणि ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. दरम्यान, दिवाळीनिमित्त आयोजित स्नेहसंमेलन व फराळाच्या कार्यक्रमात म जकी कुरेशी यांच्या पक्षबदलाच्या चर्चांना अचानक सुरुवात झाली. त्यांच्या राजकीय भूमिकेबाबत उपस्थितांमध्ये चर्चा रंगली आणि त्यानंतर स्थानिक राजकीय वर्तुळातही या चर्चेने जोर धरला. मात्र, म जकी कुरेशी नेमका कोणत्या पक्षात प्रवेश करणार, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. त्यामुळे त्यांच्या पुढील राजकीय निर्णयाकडे काँग्रेससह इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांचेही लक्ष लागले आहे. कुरेशी यांचा 'जय महाराष्ट्र' नेमका कोणाला आणि कोणत्या पक्षाला होणार, हे येत्या काळात स्पष्ट होणार आहे.

पत्रकार सुर्यकांत मालीपाटील यांना उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथपाल पुरस्कार जाहीर

उस्माननगर । प्रतिनिधी

येथील शारदा वाचनालयाचे ग्रंथपाल तथा दैनिक प्रजावणीचे पत्रकार सुर्यकांत किशनराव मालीपाटील यांना जिवन विकास ग्रंथालय, टिळकनगर, छत्रपती संभाजीनगर यांच्या तर्फे दिला जाणारा कै.के.द.वडजीकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथपाल २०२६चा पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे निवड पत्रकाद्वारे कळविले आहे. उस्माननगर (मोठी लाठी) ता.कंधार येथील शारदा वाचनलय येथे सुर्यकांत किशनराव मालीपाटील हे ग्रंथालय क्षेत्रात गेली पंचवीस वर्षांपासून उस्माननगर परिसरात निष्ठेने काम करनारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहेत. ग्रामीण



भागातील वाचकांना ग्रंथ भांडार वाचनिय ठेवत असतात. शिस्तबद्ध पद्धतीने वाचनालय सांभाळून स्वच्छता व निटनेटकेपण यांची दखल घेऊन जीवन विकास ग्रंथालय टिळक नगर छत्रपती संभाजी नगर यांच्या तर्फे दिला जाणारा कै. के.द. वडजीकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथपाल पुरस्कार २०२६ पुरस्कार जाहीर करण्यात आला असून. लवकरच डिसेंबर महिन्यात सदरील पुरस्कार. ग्रंथालयाचे अध्यक्ष न्या. अंबादासराव जोशी, कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर, कोषाध्यक्ष नितीन कंधारकर, सहकार्यवाह नृसिंह कुलकर्णी यांनी जाहीर केले आहे डिसेंबर महिन्यात सदरील पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सदरील पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल माजी मुख्याध्यापक तथा शारदा वाचनालयाचे अध्यक्ष शामसुंदर जहागीरदार गुरूजी, बा.दे. कुलकर्णी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, प्रताप सूर्यवंशी, डॉ. जगदीश कुलकर्णी, डॉ. रविंद्र लाटकर, डॉ.हंबर्डे, डॉ.चंद्रकांत सनपुरकर पुणे, रविंद्र पांडे नागपूर, किसनराव वाडीकर, संजय पोदार, जगदीश धोंड, यांच्या सह मित्र परिवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक इलासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

14 Nov 2026_Layout 1 11/14/2026 12:32 AM Page 2

कॅशलेस टोलनाक्यावर नगदी वसुलीचा आरोप!

नायगाव टोलनाक्याची उच्चस्तरीय चौकशी करा;व्यवस्थापकावर कारवाईची मागणी

मंठा/प्रतिनिधी : मंठा तालुक्यातील नायगाव येथील टोलनाका सध्या विविध तक्रारींमुळे चर्चेत आला आहे. कॅशलेस टोलनाका असताना येथे नगदी स्वरूपात पैसे स्वीकारले जात असल्याचा आरोप वाहनधारकांकडून करण्यात येत असून, या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित व्यवस्थापकावर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

ग्रामीण भागातील अनेक वाहनधारकांकडे फोन-पे, इतर डिजिटल पेमेंटची सुविधा किंवा वाहनांवर फास्टॅग नसल्याने त्यांना टोल भरण्यास अडचणी येतात. मात्र, अशा परिस्थितीत नगदी वसुली कोणत्या नियमांनुसार केली जाते, याबाबत स्पष्टता देण्याची मागणी होत आहे.टोलनाक्यावर पुरेसा प्रकाश नसल्याच्या तक्रारी असून, सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. महिला प्रवाशांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यातच काही कर्मचारी वाहनचालकांशी उद्धटपणे बोलत असल्याच्या तक्रारींमुळे वाहनधारकांमध्ये नाराजी वाढली आहे. 'टोलवसुली नियमित, मग सुविधांचा पत्ता कुठे?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

टोलनाक्याच्या आसपासच्या दोन ते तीन किलोमीटर परिसरातील चारचाकी वाहनांनाही टोल भरावा लागत असल्याने स्थानिक शेतकरी आणि वाहनधारक आर्थिक भुर्दंडामुळे त्रस्त असल्याचे सांगितले जात आहे. शेतीच्या कामासाठी वारंवार ये-जा करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी होत आहे. याशिवाय, काही कर्मचाऱ्यांकडून कथित आर्थिक देवाणघेवाण करून वाहने सोडली जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. या आरोपांची निष्पक्ष (पान २ वर)

सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये गरजू घटकांना प्राधान्याने सामावून घ्यावे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

जिल्ह्यात १४,१५,३० आणि ३१ डिसेंबरला विवाह सोहळ्याचे आयोजन



बीड (जिमाका) :- दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात दि.१४, १५, ३० आणि ३१ डिसेंबर २०२६ रोजी सामुहिक विवाह सोहळ्याचे जिल्हा प्रशासनाकडून आयोजन करण्यात आले आहे. यात लग्नातील अनावश्यक खर्च टाळून सामूहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाकडून नवदांपत्यांना २५ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. तरी सामुहिक विवाह सोहळ्यात आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक, ऊसतोड कामगार, वीटभट्टी मजूर आणि लग्नाचा खर्च पेलू न शकणाऱ्या गरजू कुटुंबांना प्राधान्याने यात सामावून घ्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात सामुहिक विवाह सोहळे आयोजित करण्यासाठी (पान २ वर)

रेणुकाई संगीत विद्यालयाचा 'स्वरदीपोत्सव २०२६' उत्साहात संपन्न!

माजलगाव/प्रतिनिधी:

दीपावलीनिमित्त रेणुकाई संगीत विद्यालय, माजलगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'स्वरदीपोत्सव २०२६' हा संगीताचा सुरेल सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात पोरे गुरुजी, पाठक मॅडम, किशोर कुलकर्णी (लऊळकर) व अपर्णा कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी विशेष अतिथी म्हणून गुरुवर्य प्राणेश पोरे तसेच कुलकर्णी यांनी संगीत ही केवळ



श्रीमती स्नेहल पाठक यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विद्यालयाचे संचालक कुणाल कला नसून ती साधना आणि संस्कारांची शिदोरी असल्याचे सांगितले. अधिकाधिक विद्यार्थ्यांना संगीताचे (पान २ वर)

अल्ट्राटेक सिमेंट प्रशासनाचा मनमानी कारभार: १४ वर्षे सेवा देणाऱ्या कुशल स्थानिक कामगारांना ऐन दुष्काळात विनाकारण काढले!

परळी वैजनाथ (प्रतिनिधी): आदित्य बिर्ला समूहाच्या परळी येथील प्रसिद्ध अल्ट्राटेक सिमेंट कंपनीत मागील १४ ते १६ वर्षांपासून अत्यंत प्रामाणिकपणे आणि उत्कृष्ट सेवा देणाऱ्या स्थानिक कुशल कामगारांना स्थानिक व्यवस्थापनाने कसलीही पूर्वसूचना न देता, कोणतीही नोटीस किंवा चौकशी न करता बेकायदेशीरपणे कामावरून काढून टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मराठवाड्यात आधीच तीव्र दुष्काळी परिस्थिती असताना, सिमेंट प्रशासनाने स्थानिक भूमिपुत्रांवर केलेल्या या गेटबंदी आणि अन्यायामुळे कामगारांच्या कुटुंबांवर ऐन दिवाळीत उपासमारीची वेळ आली असून, परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

कायद्याची पायमल्ली आणि वेतन घोटाळा

मिळालेल्या माहितीनुसार, सदर कुशल कामगार कंपनीच्या अतिशय संवेदनशील अशा हाय-व्हो-ल्टेज विद्युत विभागाची देखभाल करत होते. १४ वर्षांहून अधिक काळ अति-कुशल कारागीर(विजतंत्री)म्हणून मिलिंद वाघमारे, नागेंद्र गायकवाड,सय्यद अनिस आली व इतर एक कामगार काम करत असतानाही, स्थानिक कंत्राटदार ओम बालासाहेब मुंडे आणि कंपनीच्या एच.आर. विभागाने या कामगारांना कायद्यानुसार मिळणारे हक्काचे वेतन नाकारून, केवळ ५७० रुपये रोज देऊन प्रचंड आर्थिक शोषण (पान २ वर)



श्रीकृष्ण मंदिर हजारो दिव्यांनी उजळले परळीत दिवाळी पाडव्यानिमित्त दीपोत्सव

परळी / प्रतिनिधी

दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी असं म्हणत उत्साहात दिवाळी साजरी होत असतांनाच परळी वैजनाथ येथील श्रीकृष्ण मंदिरात १ हजार १ दिवे प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्यात आला. भगवान श्रीकृष्णांनी गोवर्धन पर्वताची पूजा केली तो आजचाच दिवस त्यामुळे गवळी समाजात या दिवसाला अनन्य साधारण महत्व आहे. यामुळेच येथील श्रीकृष्ण मंदिरात पाडव्याच्या सायंकाळी हजारो दिवे एकमेकांना जोडत दीपोत्सवाची सुंदर आरास मांडण्यात आली होती या



ज्योतीच्या प्रकाशातील भगवान श्रीकृष्णाचे सुंदर, गोजीरे रूप आपल्या डोळ्यांत साठवण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिव्यांचा सण असलेल्या दिवाळीत साकारलेल्या या उपक्रमात प्रथमेश भास्कर, निलेश जाधव, बालाजी गायकवाड, संभाजी काळे, नितीन भाकरे, प्रा.किशोर पवार, दशरथ राकेश जाधव यांच्या संकल्पनेतून गायकवाड, (पान २ वर)

नूतन आमदार डॉ.प्रतापसिंह पाटील यांचा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते सत्कार!



बीड/प्रतिनिधी : मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने दणदणीत विजय संपादन करून नवनिर्वाचित आमदार म्हणून निवडून आलेले मा. डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी आज बीड येथील राशी निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांच्या हस्ते श्रीफळ,शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला, व पुढील राजकीय वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी रायगड गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीनेही (पान २ वर)

बी.ए.एम.एस. प्रवेशासाठी पात्र ठरल्याबद्दल जान्हवी शामभाऊ बुद्रे यांचा परळीत सत्कार

परळी (प्रतिनिधी)

श्री.शामभाऊ शंकरअप्पा बुद्रे यांच्या कन्या कु.जान्हवी शाम बुद्रे यांनी वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले असून, त्यांची बी.ए.एम.एस.अभ्यासक्रमासाठी प्रवेशाकरिता पात्रता निश्चित झाली आहे. त्यांना राहाता तालुक्यातील लोणी येथील पिरॅन्स डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक कॉलेजमध्ये प्रवेशासाठी पात्र ठरल्याबद्दल त्यांचा नांदुरवेस गल्ली मित्र परिवाराच्या वतीने त्यांचा हृदयस्पर्शी सत्कार करण्यात आला. यावेळी जान्हवी बुद्रे यांना शाल,



श्रीफळ व फेटा बांधून तसेच पेढे भरवून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल उपस्थितांनी आनंद व्यक्त करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

जान्हवी यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या कुटुंबीयांसाठी अभिमानास्पद असून, त्यांच्या यशामुळे (पान २ वर)

कुणबी नोंदी शोधण्यासाठी १२ ते २० नोव्हेंबरदरम्यान विशेष मोहीम;बीड जिल्ह्यात अभिलेख तपासणीचे नियोजन!

बीड , दि . १० नोव्हेंबर : मराठा - कुणबी , कुणबी - मराठा आणि कुणबी नोंदी शोधण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील शासकीय कार्यालयांमध्ये विशेष अभिलेख शोधमोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत . निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समिती कक्षाकडून ९ नोव्हेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार , १२ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे . छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर , जालना , परभणी , हिंगोली , नांदेड , लातूर , धाराशिव आणि बीड या आठ जिल्ह्यांचा त्यामध्ये समावेश आहे . या मोहिमेच्या माध्यमातून शासकीय कार्यालयांमधील उपलब्ध अभिलेखांमध्ये कुणबी नोंदींचा शोध घेण्यावर भर देण्यात येणार आहे .

समितीच्या पत्रानुसार जिल्हानिहाय नियोजन : सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कुणबी , मराठा - कुणबी आणि कुणबी - मराठा जातीच्या प्रमाणपत्रासाठी पात्र व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे . या समितीच्या निर्देशांनुसार छत्रपती संभाजीनगर विभागातील शासकीय कार्यालयांमध्ये कुणबी नोंदी शोधण्याची विशेष मोहीम आयोजित करण्यात येत आहे . या कामासाठी जिल्हानिहाय नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले असून , अभिलेख तपासणी मोहिमेसाठी जिल्हानिहाय शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके नियुक्त करण्याबाबत कळविण्यात आले आहे . या पथकांमध्ये मराठा आरक्षण आंदोलनाचे श्री . मनोज जरांगे - पाटील यांनी सुचविलेल्या अभ्यासक प्रतिनिधींचा , मोडी लिपी वाचकांचा तसेच वंशावळ जुळविण्याच्या कामातील तज्ज्ञांचाही समावेश करण्याचे निर्देश पत्रात देण्यात आले आहेत . त्यामुळे जुन्या शासकीय अभिलेखांमधील नोंदींचा शोध घेण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेसोबतच संबंधित विषयातील तज्ज्ञांची (पान २ वर)

जागतिक मधुमेह दिनानिमित्त डॉ.अतुल शिंदे यांचे आवाहन; नियमित तपासणी,संतुलित आहार आणि व्यायामावर भर

धारूर/अतूल शिनगारे

मधुमेह हा केवळ रक्तातील साखर वाढण्याचा आजार नसून तो शरीरातील अनेक महत्त्वाच्या अवयवांवर गंभीर परिणाम करणारा आजार आहे. त्यामुळे मधुमेहाचे वेळीच निदान, नियमित तपासणी आणि योग्य उपचारांसोबत शिस्तबद्ध जीवनशैलीचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवल्यास मधुमेहामुळे उद्भवणारे गंभीर धोके टाळता येऊ शकतात, असे आवाहन धारूर येथील सध्या अंबाजोगाई येथे वास्तव्य करत असलेले योगेश्वरी डायबिटिस केअर सेंटरचे संचालक व मधुमेहतज्ज्ञ डॉ. अतुल शिंदे यांनी जागतिक मधुमेह दिनानिमित्त केले आहे.

दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी जागतिक मधुमेह दिन साजरा केला जातो. इन्सुलिनचा शोध लावणारे शास्त्रज्ञ डॉ. फ्रेडरिक बँटिंग यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस पाळला जातो. मधुमेहाविषयी जनजागृती करणे, या आजाराचे लवकर निदान व्हावे आणि रुग्णांनी योग्य उपचार घेऊन रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवावे, हा या दिनामागील प्रमुख उद्देश आहे.

मधुमेह हा शरीरातील इन्सुलिन या संप्रेरकाच्या कमतरतेमुळे किंवा इन्सुलिन योग्य प्रकारे कार्य न केल्यामुळे होतो. इन्सुलिन शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचे काम करते. मात्र, त्याच्या कार्यात अडथळा निर्माण झाल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते. मधुमेहाचे प्रामुख्याने टाइप-१, टाइप-२ आणि गर्भावस्थेतील मधुमेह असे प्रकार आहेत. यामध्ये टाइप-२ मधुमेहाचे प्रमाण अधिक असून चुकीचा आहार, वाढते वजन, व्यायामाचा अभाव, ताणतणाव आणि अनियमित जीवनशैली ही त्यामागील महत्त्वाची कारणे आहेत.

भारतात मधुमेहाचे प्रमाण चिंताजनक असून अनेक नागरिकांना आपल्याला मधुमेह असल्याची जाणीवही नसते. परिणामी, आजाराचे निदान उशिरा होते आणि उपचार सुरू (पान २ वर)

अडत व्यापारी शिक्षण संस्था, देगलूर जि. नांदेड

देगलूर महाविद्यालय च्या वतीने दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा



कार्यकारणीची यादी
प्रकाश निवृत्तीराव पाटील बेम्बरेकर, अध्यक्ष
जनार्धन जयराम चिद्रावार, उपाध्यक्ष,
डॉ. कर्मवीर पोशट्टी उनग्रतवार, सचिव
राजकुमार राम महाजन, सहसचिव
विलास शंकरराव लोटावार, कोषाध्यक्ष
सुर्यकांत गोविंद नारलावार

कार्यकारणी सदस्य : - देवेंद्र बालाजीराव मोतेवार, कार्यकारणी सदस्य, गंगाधर यशवंतराव जोशी कार्यकारणी सदस्य, रविंद्र काशिनाथअप्पा द्याडे कार्यकारणी सदस्य, चंद्रकांत राजन्ना नारलावार कार्यकारणी सदस्य, गुरुराज शशिकांत चिद्रावार स्विकृत सदस्य, विजय पोशट्टी उनग्रतवार स्विकृत सदस्य, प्राचार्य डॉ. मोहन नामदेव खताळ पदसिध्द सदस्य

शुभ दिपावली



कार्यालय देगलूर नगरपरिषद देगलूर जि. नांदेड

फोन नंबर. १०२४६३१ २५७६२४ फॅक्स नंबर. (०२४६१) २५५७७७
ई-मेल codecleorgmail.com

विभाग- आरोग्य न.पा.जा.क्र//२०२६ दि.२९/१६/२०२६

जाहीर आवाहन

समस्त नागरीकांना आवाहन करण्यात, दिवाळी हा आनंदाना, प्रकाशाचा आणि उत्साहाचा सण आहे. हा सण ला संरक्षण करणे, व वायुप्रणूल्न करणे आणि सर्व आरोग्याची काळजी घेणे ही आपली सामुहिक जवाबदारी आहे. माननीय उच्च न्यायालय, मुबई पाचा आदेश स्वस्ते, पदपथ आणि सार्वजनिक डिकाणी फटाके वाजविण्यास बांदी आहे. तसेच, स्कूले, रुणालये, न्यायालये व धार्मिक स्थळे यांसह शांतता प्रांत फटाके वाजविण्यास सक्षम मानाई आहे. सार्वजनिक कार्यक्रमांमधी लेक्षर आणि बीम लाइटचा वापर करण्यासही बंदी असून, आवाजवी लीव्रता मोजण्यासाठी यंत्र बसविणे.

शुभ दिपावली

त्यामुळे यावर्षीची दिवाळी प्रदूषण, पर्यावरणपुक पद्धतीने करण्यासाठी पुढील बाबींचे पालन कराये.
मातीच्या पणत्या व दिव्यांचा वापर करा आणि फकापा पसरवा.
फटाकाचा वापर द्याडग्याचा वापर करा आमने क्षक्रेय विवका ओका ठेवा.
मोठवा आवाजा व फटाके कोळूल, लहान मुले, योची कालजी घ्या.
मोठ्या आवाजाचे घाराके पडेहण टालूल गुणवत्तव रकमी घ्या.
फटाक्या शवरच्य होणार आहेत बापुप्रदूषण उपस्थितूप्यूल करा.
व वतर सामग्री साहित्य वापरणे, कच-याची तौल्हे वावा आणि रितव स्थळ ठेवा.
दिवालीच्या फराळा अनेक मगविरणपूरक सण करीयाचनातेवाईक, मित्रवरिवार व शेजा-यापर्यंत पोहोचरा.

दीपावलीच्या सर्व नागरिकांना दीपमय शुभेच्छा !

मा.सौ विजयमाला बी. टेकाळे नगराध्यक्षा नगर परिषद देगलूर
मा.ॲड. अंकुश सुरेश देसाई उपनगराध्यक्ष नगर परिषद देगलूर
मा. श्रीमती निलम कांबळे मुख्याधिकारी नगर परिषद देगलूर

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगभित्र

PRGI.No.- MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.१४ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

वंदयत्व : मुल बाळ होत नसल्यास, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै.
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

येडशीमध्ये घराला आग, एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू

धाराशिव । प्रतिनिधी

दिवाळीचा सण... घराघरांत आनंदाचे वातावरण... लक्ष्मीपूजनानिमित्त सजलेली दुकाने... आणि कुटुंबासोबत सण साजरा करण्यासाठी बाहेरगावाहून गावी आलेल्या दोन मुली... मात्र, येडशीतील करंडे कुटुंबासाठी ही दिवाळी काळरात्र ठरली. किराणा आणि सौंदर्य प्रसाधनांच्या दुकानाला लागलेल्या भीषण आग घरात पोहचली आणि एकाच कुटुंबातील सहा जणांचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाला.

धाराशिव शहरापासून अवघ्या १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या येडशी गावची रविवारची पहाट काळीज पिळवटून टाकणाऱ्या घटनेने उजाडली, येडशीतून लातूरकडे जाणाऱ्या चौकात करंडे कुटुंबाची किराणा आणि सौंदर्य प्रसाधनांची दोन दुकाने आहेत. रविवारी सायंकाळी लक्ष्मीपूजनानिमित्त दुकानांची पूजा आटोपल्यानंतर दुकाने बंद करण्यात आली.

त्यानंतर पहाटे दोन ते अडीचच्या सुमारास दुकानांना आगीच्या ज्वाळांनी वेढल्याचे शेजाऱ्यांच्या निदर्शनास आले. उत्तम त्रिंबक करंडे (७५), चंद्रकला उत्तम करंडे (७०), गोविंद उत्तम करंडे (४७), ज्योती गोविंद करंडे (४२), गायत्री गोविंद करंडे (१७) आणि सिद्धी गोविंद करंडे (१४) यांचा या दुर्घटनेत अंत झाला. दिवाळीचा आनंद साजरा करण्यासाठी गावी आलेल्या दोन्ही मुलींनाही काळाने हिरावून नेले. या घटनेने येडशी गावावर शोककळा पसरली असून, करंडे कुटुंबाचे हसते खेळते घर क्षणात उद्ध्वस्त झाले.



दुकानांच्या वरच्या मजल्यावर करंडे कुटुंब वास्तव्यास होते. कुटुंबातील सहाही सदस्य गाढ झोपेत होते. दुकान आणि घरातून बाहेर पडण्यासाठी एकच मार्ग असल्याने आगीच्या ज्वाळांनी त्याच मार्गाला वेढा घातला होता. दोन्हीं दुकानांतील साहित्याने आगीने वेगाने पेट घेतला आणि धुराचे लोट वरच्या मजल्यावरील घरात शिरू लागले. झोपेत असलेल्या कुटुंबीयांना धुराचा त्रास सुरू झाला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येताच त्यांनी मदतीसाठी आक्रोश केला; मात्र धुरामुळे त्यांचा आवाज बाहेरपर्यंत पोहोचू शकला नाही. बाहेर पडण्याचा मार्ग आगीने अडवल्याने त्यांना जीव वाचवण्याची संधीही मिळाली नाही.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी धाव घेतली. अनेकांनी आपापल्या बोअरवेल सुरू करून पाण्याचा मारा केला. धाराशिव, कळंब आणि तुळजापूर येथून अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. ग्रामस्थांनी जेसीबीच्या साह्याने घराची भिंत फोडून धुराचे लोट बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, आग आटोक्यात येईपर्यंत आणि बचावकार्य सुरू होईपर्यंत खूप उशीर झाला होता. सहाही जणांचा मृत्यू झाला होता. दिवाळीच्या पणत्यांमुळे आग लागल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पहाटेच गावात धाव घेत बचावकार्यात सहभाग घेतला. त्यानंतर आमदार कैलास पाटील, आमदार प्रतापसिंह पाटील तसेच खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला, पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. याबाबत धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्यात नोंद करण्याचे काम सुरू होते. वरिष्ठ पोलिस अधिकारीही येथे ठाण मांडून होते. दुर्घटनेचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक रितू खोखर यांनी दिली.

अग्निशमन व्यवस्थेवर गावकऱ्यांचा संताप

या दुर्घटनेच्या निमित्ताने धाराशिव नगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडील वाहनांच्या सज्जतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. धाराशिवमधील अग्निशमन वाहनांच्या क्षमतेबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम आणि तत्पर असती, तर कदाचित काही जीव वाचवता आले असते, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. ट्रॅव्हल्स चालकामुळे दुर्घटनेची माहिती मिळाली पहाटे अडीचच्या सुमारास पुण्याहून लातूरकडे जाणाऱ्या एका ट्रॅव्हल्स चालकाच्या निदर्शनास रस्त्यालगतचे घर आणि दुकाने पेटल्याचे आले. त्याने वाहन पुढे नेत लातूर रस्त्यावरील रात्रभर सुरू असलेल्या एका हॉटेलमध्ये याची माहिती दिली. हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी मालकाला सांगितल्यानंतर त्यांनी गावातील नागरिकांना दूरध्वनीद्वारे कळवले. त्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. एका प्रवाशाच्या सतर्कतेमुळे गावकऱ्यांना दुर्घटनेची माहिती मिळाली; मात्र तोपर्यंत आगीने मोठे नुकसान केले होते.

दिवाळीसाठी गावी आल्या अन् काळाने गाठले

करंडे कुटुंबातील गायत्री आणि सिद्धी या दोन्ही मुली शिक्षणासाठी बाहेरगावी होत्या. दिवाळीचा सण आई-वडील आणि कुटुंबीयांसोबत साजरा करता यावा, या ओढीने त्या गावी आल्या होत्या. सणाच्या आनंदात कुटुंबासोबत घालवलेले ते काही क्षण अखेरचे ठरले. अवघ्या १७ आणि १४ वर्षांच्या या मुलींचा अशा प्रकारे अंत झाल्याने गावकऱ्यांचे डोळे पाणावले.

तुळजाभवानी मंदिर परिसरात आगीचा भडका; भाविकांची धावपळ, मंदिरात गोंधळाचे वातावरण

तुळजापूर । प्रतिनिधी

दिवाळी पाडव्याच्या सणानिमित्त आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी उसळलेली असतानाच मंदिर परिसरात मंगळवारी (दि. १०) दुपारी अचानक आग लागल्याची घटना घडली. बिडकर तलाव परिसरात लागलेल्या या आगीमुळे काही काळ एकच खळबळ उडाली. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट दिसताच दर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये घबराट पसरली. अनेक भाविकांनी सुरक्षित स्थळी जाण्यासाठी धावपळ केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दीपावली उत्सवातील पाडवा हा महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी आई तुळजाभवानीचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्रासह परराज्यांतूनही मोठ्या संख्येने भाविक तुळजापूर येथे दाखल होतात. त्यामुळे मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची मोठी वर्दळ असते. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना बिडकर तलाव मार्गे मंदिराकडे सोडण्यात येते. अशा गर्दीच्या वेळीच दुपारच्या सुमारास बिडकर तलाव परिसरात अचानक आगीचा भडका उडाला.

परिसरात आग लागल्याचे निदर्शनास



येताच भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आगीच्या ठिकाणापासून दूर जाण्यासाठी अनेकांनी धावपळ सुरू केली. काही काळ मंदिर परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, या आगीत परिसरात भाविकांनी टाकलेला कचरा तसेच डोंगरावरील मोठ्या प्रमाणातील वाळलेली झाडे आणि झुडपे जळून खाक झाली. आगीने परिसरातील सुक्या वनस्पतींना वेढल्याने काही काळ आग मोठ्या प्रमाणात पसरल्याचे दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आग विझविण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू केले. जवानांच्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसून मोठी दुर्घटना टळली आहे. दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मंदिर परिसरात सणासुदीच्या काळात भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने अशा घटनांमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी परिसरातील कचऱ्याची नियमित विल्हेवाट आणि वाळलेल्या झाडाझुडपांची स्वच्छता करण्याची गरज व्यक्त होत आहे.

पालमच्या शनिवार बाजारात घरांच्या दारासमोर फटाक्यांची दुकाने; मोठ्या दुर्घटनेची शक्यता!

नियमांना हरताळ? पालम नगरपंचायत प्रशासन आणि संबंधित यंत्रणेने तातडीने लक्ष देण्याची गरज!

पालम । अनिस खुरेशी



दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पालम नगरपंचायत हद्दीतील शनिवार बाजार परिसरात फटाक्यांची अनेक दुकाने थाटण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, काही ठिकाणी थेट नागरिकांच्या घरांच्या दारासमोरच फटाक्यांची दुकाने सुरू करण्यात आल्याचे चित्र दिसत आहे. फटाके हे ज्वलनशील असल्याने अशा दुकानांमध्ये आग लागल्यास आजूबाजूच्या घरांनाही त्याचा मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांच्या जीविताला आणि मालमत्तेला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यापूर्वीही फटाक्यांच्या अतिवापरामुळे विविध ठिकाणी आगीच्या घटना घडल्या आहेत. असे असताना पालममध्ये निवासी घरांच्या दारासमोर फटाक्यांची दुकाने लावण्यास परवानगी कशी देण्यात आली? संबंधित दुकानदारांकडे आवश्यक परवाने आणि अग्निसुरक्षेच्या उपाययोजना आहेत का? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे. महाराष्ट्र शासनाने फटाक्यांसंदर्भात घेतलेल्या निर्णयाचे स्वागत असले, तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणार कधी? केवळ नियम करून चालणार नाही, तर त्यांची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

पालम नगरपंचायत प्रशासन, पोलीस प्रशासन आणि अग्निशमन यंत्रणेने शनिवार बाजार परिसरातील फटाक्यांच्या दुकानांची तातडीने तपासणी करावी. नियमबाह्य किंवा असुरक्षित ठिकाणी दुकाने असल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने खबरदारी घेणे गरजेचे आहे! फटाकेमुक्त, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक दिवाळी हीच काळाची गरज!

उमरग्याच्या आमदारांची महापालिकेस सदिच्छा भेट; महापौर सय्यद इकबाल यांच्या हस्ते सत्कार

परभणी । प्रतिनिधी

उमरगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी परभणी शहर महानगरपालिका कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी महापौर सय्यद इकबाल सय्यद ख्वाजा यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत व सत्कार केला. या भेटीदरम्यान परभणी शहराच्या विकासासह विविध नागरी प्रश्नांवर पदाधिकारी, नगरसेवक आणि मान्यवरांमध्ये सकारात्मक चर्चा झाली.

महापालिका कार्यालयात झालेल्या या भेटीत आमदार प्रवीण स्वामी यांनी महापौर सय्यद इकबाल यांचाही सत्कार केला. परभणी शहराच्या विकासाच्या दृष्टीने सुरू असलेले उपक्रम, नागरी सुविधांचा विस्तार आणि भविष्यातील विकासकामे यासंदर्भात यावेळी विचारविनिमय करण्यात आला. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय आणि सहकार्य असणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



परभणी शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांना आपले नेहमीच सहकार्य राहील. शहराच्या प्रगतीसाठी आणि नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने शक्य ते सर्व सहकार्य करण्यास आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही आमदार प्रवीण स्वामी यांनी यावेळी दिली. त्यांच्या या आश्वासनाचे उपस्थित पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.

या प्रसंगी सभागृह नेते सय्यद समीर ऊर्फ माजला, गटनेते दिलीप ठाकूर, माजी सभापती अतुल सरोदे, समाजसेवक सय्यद कादर, समाजकल्याण सभापती राजेश रणखांबे, शरफोद्दीन सिद्दीकी, नगरसेवक व्यंकट डहाळे, श्याम खोबे, शंकर आजेगावकर, शुभम पाटे, मिलिंद घागरमाळे, शेख हुसेना बानो, शेख हबीब, मोहम्मद इब्राहिम बागवान, अनिल डहाळे, नारायण अवचार, सुलोचना भालेराव, डॉ. अनिल कांबळे, अर्जुन गुजर, तांबोळी, जावेदहा परवीन, अ. हमीद, अलीम कुरेशी, विकास राजापुरे आदी उपस्थित होते. या सदिच्छा भेटीमुळे परभणी आणि उमरगा येथील लोकप्रतिनिधींमध्ये परस्पर संवाद व समन्वय वाढण्यास मदत होणार असून, शहराच्या विकासासाठी सहकार्याची नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

मोबाईलसाठी पैसे न दिल्याने मुलाकडून वडिलांचा खून

धाराशिव । प्रतिनिधी

मोबाईल खरेदी करण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून मुलाने लोखंडी पाईपने केलेल्या मारहाणीत वडिलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना तुळजापूर तालुक्यातील येवती येथील डोंबाळे वस्तीवर घडली. या प्रकरणी नळदुर्ग पोलिसांनी संशयित मुलाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. खंडू पांडुरंग डोंबाळे (वय ५६) असे मृत वडिलांचे नाव असून, श्रीशैल ऊर्फ बबलू खंडू डोंबाळे (वय २९) असे संशयित आरोपी मुलाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीशैल याने मोबाईल खरेदी करण्यासाठी वडील खंडू डोंबाळे यांच्याकडे पैशांची मागणी केली होती. मात्र, वडिलांनी पैसे देण्यास नकार दिल्याने श्रीशैल संतापला. त्याने वडिलांना शिवीगाळ करीत लोखंडी पाईपने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात खंडू डोंबाळे गंभीर जखमी झाले. या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी मृताची पत्नी सुरेखा खंडू डोंबाळे (वय ५०) यांनी बुधवारी (दि. ११) नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार श्रीशैल डोंबाळे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

नागपूर-काटोल रोडवर फेटरी हॉट धाब्यासमोर अपघात; एकजण जखमी!

नागपूर । नीलम चकोले

दिनांक : १३ नोव्हेंबर २०२६
अपघाताची वेळ : रात्री १० वाजताच्या सुमारास
अपघातस्थळ : फेटरी हॉट धाब्यासमोर, नागपूर-काटोल रोड नागपूर-काटोल रोडवरील फेटरी येथील हॉट धाब्यासमोर अपघाताची घटना घडली. या अपघातात हिरानंद मुडे (वय ४० वर्षे), रा. आष्टी (येरला) हे जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच जखमींना



तात्काळ मदत करून पुढील उपचारासाठी जोसेफ हॉस्पिटल, केरला येथे दाखल करण्यात आले.

अपघातातील जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताचे कारण सध्या माहिती नाही रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा! देव्यांशी फाउंडेशन - सामाजिक व रुग्णसेवक मंगेश भाऊ गमे अपघातात सतर्क राहा, वाहतुकीचे नियम पाळा आणि सुरक्षित प्रवास करा!

नगरपंचायत पालममधील कथित भ्रष्टाचारावर आमदार रत्नाकरराव गुट्टे साहेब काय भूमिका घेणार?

पालम-पूर्णा-गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे लक्ष आमदारांच्या भूमिकेकडे!

पालम । अनिस खुरेशी

पालम शहरातील नगरपंचायत मधील विकासकामांमध्ये कोटच्यवधी रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा आता चर्चेचा विषय ठरत आहे. आमदार रत्नाकरराव गुट्टे साहेब यांच्या नेतृत्वाखालील नगरपंचायतीच्या कारभारातील या गंभीर आरोपांवर ते नेमकी काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण पालम-पूर्णा-गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.



विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याचे आरोप आहेत. दोन वेळा चौकशी झाल्यानंतर तत्कालीन मुख्याधिकारी संतोषजी लोमटे यांच्यासह सात जणांवर दोषारोप निश्चित झाल्याचा दावा करण्यात येत असून, कारवाईसाठी अहवाल अपर सचिवांकडे पाठविण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. या पार्श्वभूमीवर ड. रामजी मणियार यांनी आमदार रत्नाकररावजी गुट्टे साहेब यांना निवेदन देऊन दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

आता जनतेचे थेट प्रश्न!

चौकशी अहवालानंतर दोषींवर प्रत्यक्ष कारवाई होणार का? संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का? संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यासाठी पुढाकार घेतला जाणार का? जनतेच्या पैशाचा हिशोब जनतेसमोर मांडला जाणार का?

संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष!

आमदार साहेब, विकासासाठी निधी देणे ही महत्त्वाची बाब आहे; पण त्या निधीतून झालेल्या कामांचा हिशोब घेणे आणि गैरव्यवहार सिद्ध झाल्यास दोषींवर कारवाईसाठी पाठपुरावा करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. आता आमदार रत्नाकरराव गुट्टे साहेब या प्रकरणात कोणती ठोस भूमिका घेतात, दोषींवर कारवाईसाठी काय पावले उचलतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पालमच नव्हे, तर पूर्णा आणि गंगाखेडसह संपूर्ण विधानसभा मतदारसंघाचे लक्ष या प्रकरणातील पुढील घडामोडींकडे लागले आहे!

उड्डाणपुलावर वाहतूक कोलमडली; पोलीस यंत्रणेच्या दुर्लक्षाने नागरिक त्रस्त!

दोन तास वाहनांच्या लांबच लांब रांगा; हजारो प्रवासी कोंडीत अडकले


परभणी । प्रतिनिधी

परभणी शहरातील गंगाखेड नाक्यावरील उड्डाणपुलावर शुक्रवारी सायंकाळी वाहतुकीचा पूर्णतः बोजवारा उडाला. सायंकाळी सव्वापाच वाजल्यापासून सुरू झालेली वाहतूक कोंडी रात्री उशिरापर्यंत कायम राहिल्याने वाहनांच्या तिन्ही दिशांनी तब्बल एक किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या. दोन तासांहून अधिक काळ हजारो प्रवासी या कोंडीत अडकून पडले. विशेष म्हणजे, एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही वाहतूक सुरळीत करण्यासाठी शहर वाहतूक पोलिस यंत्रणेचे प्रभावी प्रयत्न दिसून आले नाहीत. त्यामुळे वाहनधारकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

परभणी शहरातील रेल्वेस्थानक, बसस्थानक आणि गंगाखेड नाका परिसरात गेल्या काही महिन्यांपासून बेशिस्त वाहतुकीमुळे दररोज कोंडी निर्माण होत आहे. मात्र, या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे.

शुक्रवारी सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास गंगाखेड नाक्यावरील उड्डाणपुलाच्या चौकात वाहनांची कोंडी सुरू झाली. जिंतूर रोड, बसस्थानक रोड आणि गंगाखेड रोड या तिन्ही बाजूंनी येणाऱ्या वाहनचालकांनी एकमेकांना पुढे जाण्यासाठी रस्ता अडविल्याने वाहतुकीचा पूर्णतः खोळंबा झाला. वाहनचालकांमध्ये पुढे जाण्याची चढाओढ सुरू झाल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली. पाहता पाहता तिन्ही दिशांनी एक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. या कोंडीत खासगी वाहने, एसटी बसेस, दुचाकी आणि अन्य वाहनांसह हजारो प्रवासी अडकून पडले. दोन तासांहून अधिक काळ वाहने जागेवरच उभी राहिल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. अनेक प्रवाशांचे नियोजन कोलमडले, तर महत्त्वाच्या कामांसाठी निघालेल्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला.

विशेष म्हणजे, वाहतुकीचा एवढा मोठा खोळंबा होऊनही वाहतूक पोलिस यंत्रणेचे कर्मचारी कोंडी फोडण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न करताना दिसले नाहीत. पोलिसांच्या या उदासीन भूमिके मुळे वाहनधारकांनी संताप व्यक्त केला. शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियंत्रणासाठी पुरेसे मनुष्यबळ तैनात करावे आणि गंगाखेड नाक्यावरील वाहतूक कोंडीवर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.१४ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

देहूगावात दिवाळीच्या फटाक्यांमुळे आगीच्या तीन घटना; मालमत्तेचे नुकसान

देहूगाव । प्रतिनिधी

दिवाळी सणाच्या उत्साहात फटाके फोडताना घेतलेल्या निष्काळजीपणामुळे श्रीक्षेत्र देहूगाव परिसरात आगीच्या तीन घटना घडल्या आहेत. फटाक्यांतून उडालेल्या ठिणग्यांमुळे विविध ठिकाणी आग लागून मालमत्तेचे नुकसान झाले. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दीपावलीच्या पार्श्वभूमीवर देहूगावातील रहिवासी तसेच वर्दळीच्या भागांमध्ये फटाक्यांच्या विक्रीसाठी दुकाने थाटण्यात आली होती. अशा गर्दीच्या आणि रहिवासी भागांमध्ये फटाक्यांची विक्री करताना सुरक्षिततेच्या उपाययोजनांची आवश्यकता असते. मात्र, फटाके फोडताना आवश्यक ती खबरदारी न घेतल्याने आगीच्या घटना घडल्याचे समोर आले आहे.

सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

फटाक्यांच्या ठिणग्यांमुळे लागलेल्या आगीत मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सुदैवाने जीवितहानी टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला असला, तरी या घटनांमुळे फटाक्यांच्या विक्रीच्या ठिकाणी तसेच आतषबाजीदरम्यान सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

रहिवासी आणि वर्दळीच्या परिसरात फटाक्यांची विक्री करण्यास परवानगी देताना प्रशासनाकडून पुरेशा सुरक्षा उपाययोजना केल्या जातात का?, आगीच्या घटना रोखण्यासाठी अग्निसुरक्षेची साधने उपलब्ध असतात का?, असे प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने फटाका विक्रीची ठिकाणे आणि सुरक्षिततेच्या नियमांची काटेकोर तपासणी करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

'दवाखान्यात जाण्यापूर्वी मला फोन करा; बहिणींच्या उपचारांचा खर्च कमी करण्यासाठी भाऊ म्हणून पूर्ण ताकद लावणार!' : आ. शेळके

वडेश्वरमध्ये 'मायेची भाऊबीज' सोहळ्याला माता-भगिनींची तुफान गर्दी; बैलगाडीतून आमदारांची मिरवणूक, महिला भगिनींनी सारथ्याचीही सांभाळली धुरा!



मावळ । प्रतिनिधी

नातं प्रेमाचं, बंध मायेचा आणि सण भाऊबीजेचा... या भावनिक नात्याला सामाजिक बांधिलकीची जोड देत मावळचे आमदार सुनील शेळके यांनी वडेश्वर येथे आयोजित 'मायेची भाऊबीज' सोहळ्यात माता-भगिनींना मदतीचा शब्द दिला. माझ्या कोणत्याही बहिणीला किंवा तिच्या कुटुंबातील सदस्याला दवाखान्यात दाखल करण्याची वेळ आली, तर रुग्णालयात जाण्यापूर्वी मला एकदा संपर्क करा. उपचारांचा खर्च कमीत कमी कसा होईल, मोफत उपचार कसे मिळतील, यासाठी हा भाऊ पूर्ण ताकदीने प्रयत्न करेल, अशी भावनिक ग्वाही आमदार शेळके यांनी दिली. त्यांच्या या विधानाने उपस्थित माता-भगिनींमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले.

आंदर मावळमधील वडेश्वर येथे गुरुवारी (दि. १२) आयोजित या भाऊबीज सोहळ्याला माता-भगिनींनी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. वडेश्वर, वहानगाव, नागाथली, माऊ, गभालेवाडी आणि सटवाईवाडी परिसरातील महिलांनी या सोहळ्याला मोठी गर्दी केली होती. आमदार सुनील शेळके यांचे स्वागत करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे, आमदार शेळके यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. या बैलगाडीचे सारथ्य एका महिला भगिनीने केले, तर इतर महिलांनीही बैलगाडीतून सहभागी होत उत्साहात मिरवणूक काढली. महिलांनी भाऊबीजेची गीते गात आमदार शेळके यांचे औक्षण केले आणि त्यांच्याविषयीचे प्रेम व विश्वास व्यक्त केला.

यावेळी बोलताना आमदार शेळके म्हणाले की, माझ्या राजकीय वाटचालीच्या सुरुवातीपासूनच माता-भगिनी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या आहेत. त्यांचे प्रेम आणि विश्वास हीच माझ्या कामाची खरी प्रेरणा आहे. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या पाठीशी भाऊ म्हणून उभे राहणे, ही माझी जबाबदारी आहे. आरोग्याच्या बाबतीत कोणतीही अडचण आल्यास माझ्याशी संपर्क साधावा. उपचारांसाठी कमीत कमी खर्च कसा येईल, तसेच शक्य तेथे मोफत उपचार कसे मिळतील, यासाठी मी प्रयत्नशील राहीन. मात्र, सर्वांना निरोगी आणि दीर्घायुष्य लाभावे, दवाखान्यात जाण्याची वेळच येऊ नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे, असेही त्यांनी सांगितले.

या सोहळ्यात आमदार शेळके यांनी विरोधकांनाही आपल्या खास शैलीत टोले लगावले. त्यामुळे भाऊबीजेच्या भावनिक वातावरणात राजकीय फटकेबाजीचीही रंगत पाहायला मिळाली. कार्यक्रमाला महिलांसह पुरुष नागरिकांचीही मोठी उपस्थिती होती. यावेळी महिलांना फराळाचे वाटप करण्यात आले. श्री. विठ्ठलराव शिंदे, श्री. गणेश खांडगे, गणेश आप्पा ढोरे, साहेबराव कारके यांच्यासह विविध पदाधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य, परिसरातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाऊबीजेच्या निमित्ताने दिलेली आरोग्यविषयक मदतीची ग्वाही आणि बहिणींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा दिलेला शब्द, यामुळे वडेश्वरमधील 'मायेची भाऊबीज' सोहळा केवळ सणापुरता मर्यादित न राहता माया, विश्वास आणि सामाजिक बांधिलकीचा सोहळा ठरला.

पिंपळगाव गोलेगावात अखेर पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद

पिंपळगाव मध्ये ऊसतोड कामगारांवर बिबट्याचे हल्ल्यात कामगार जखमी

आळंदी । प्रतिनिधी

येथील मौजे पिंपळगाव गोलेगाव येथे उपवनसंरक्षक जुन्नर, मा. सहाय्यक वनसंरक्षक, जुन्नर, व मा. वन परिक्षेत्र अधिकारी, चाकण यांच्या मार्गदर्शना खाली मालकी क्षेत्रात लावलेल्या पिंजऱ्यात अखेर बिबट्या जेरबंद झाला. पिंपळगाव मध्ये ऊसतोड कामगारांवर बिबट्याचे हल्ल्यात कामगार जखमी झाला होता. या जेरबंद झालेल्या बिबट्यास तपासणी व उपचारासाठी बिबट निवारा केंद्र माणिकडोह येथे पाठविण्यात आले आहे.

या प्रसंगी वनपाल आळंदी आनंदकुमार इंदलकर. वनरक्षक दिपाली रावते, वनरक्षक नवनाथ पगडे, वन सेवक अजय कोळेकर, धनराज तोंडे, दौलत वाडेकर, किसन पारधी, राघू ठाकर यांचेसह इतर वन कर्मचारी उपस्थित होते. पिंपळगाव तर्फे चाकण येथील सरपंच विलासराव नाथु काकडे यांचा जमीन गट नंबर २७ मध्ये शेतातील ऊसतोड कर्मचारी ऊसतोड करीत असताना ऊसतोड कर्मचारी अंबरसिंह महादु चव्हाण याच्यावर अचानक पणे बिबटचाने हल्ला करून जखमी केले होते.



या वेळी इतर ऊसतोड कर्मचाऱ्यांनी मोठ्या मोठ्याने आरडा ओरडा केल्याने बिबट्याने ऊसतोड कामगारास जखमी अवस्थेत सोडून पळ काढला होता. त्यानंतर जखमी चव्हाण यांना तत्काळ आळंदी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले. या वेळी सदर ऊसतोड सुरू असलेल्या शेतात मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ जमा झाले होते.

या पुढे देखील बिबट्या कडून ग्रामस्थ, ऊसतोड कामगार, शेतकऱ्यांवर हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मुळे प्रभावी दक्षता उपाय योजना करण्याची मागणी करण्यात आली होती. या भागात तत्काळ वन विभाग अधिकारी कर्मचाऱ्यांनी पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते पै. बाळासाहेब चौधरी यांनी केली होती. त्या प्रमाणे वन विभागाने तत्काळ कारवाई करून पिंजरा लावला होता. त्यात बिबट्या जेरबंद करण्यास यश आले.

पिंपरी चिंचवडमध्ये ३० व्या आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लायम्बिंग चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

देशभरातील खेळाडूंचा सहभाग; राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या आयोजनामुळे शहराच्या क्रीडा क्षेत्राला नवी ओळख

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपळे सौदागर येथील योगा उद्यानातील क्लायम्बिंग वॉलवर आयोजित करण्यात आलेल्या ३० व्या आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लायम्बिंग चॅम्पियनशिप २०२६ या स्पर्धेचे उद्घाटन आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या उद्घाटनप्रसंगी नगरसदस्य शत्रुघ्न बाप्पू काटे, नाना काटे, अनिता काटे, कुंदा भिसे तसेच देवांग नाईक, के. सरस्वती, श्रीकृष्ण कडुस्कर यांच्यासह देशाच्या विविध भागांतून सहभागी झालेले खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक, क्रीडाप्रेमी प्रेक्षक आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. महाराष्ट्र क्लायम्बिंग असोसिएशन आणि इंडियन माउंटेनियरिंग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. देशाच्या विविध भागांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून, त्यांना आपल्या कौशल्याचे आणि क्रीडा नैपुण्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळत आहे. पिंपरी चिंचवड शहरात राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन होणे ही शहरासाठी अभिमानाची बाब आहे. अशा स्पर्धांमुळे शहराची राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण होण्यास मदत होते, तसेच स्थानिक खेळाडूंनाही प्रोत्साहन मिळते. पिंपळे सौदागर येथील जागतिक दर्जाच्या क्लायम्बिंग वॉलमुळे भविष्यात या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करण्यासाठीही निश्चितच पोषक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना देणे, उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी महापालिकेच्या वतीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. अशा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांच्या आयोजनातून शहराच्या क्रीडा क्षेत्राच्या विकासाला अधिक गती मिळेल.

आळंदीतील भराव रस्त्यावर गाड्या थेट माऊली मंदिरासमोर भाविक व मंदिर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

आळंदी जनहित फाउंडेशनची गतिरोधक बसवण्याची मागणी

आळंदी । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र आळंदी येथील मुख्य तीर्थक्षेत्र आळंदीतील भराव रस्त्यावर लोखंडी गेट, आळंदी देवस्थानचे सुरक्षा कर्मचारी असताना थेट सर्व प्रकारच्या गाड्या माऊली मंदिरासमोर थेट येतात. यामुळे भाविक आणि मंदिर व परिसर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भराव रस्त्यावर एकही गती रोधक नसल्याने वाहने सुसाट मंदिराकडे येतात. भराव रस्त्यावर नो पार्किंग बोर्ड नावापुरता असून ५० मीटर दोन्ही बाजूने वाहन पार्क करण्यास मनाई असताना बेशिस्त पार्किंग वाढली असल्याने भाविक, नागरिकांना ये जा करण्यास गैरसोयीचे होत आहे. यामुळे त्यांनी नाराजी व्यक्त केलं.



आळंदी नगरपरिषदेने गावभर गतिरोधक बसविले. मात्र मंदिर परिसरातील वर्दळीचा मुख्य भराव रस्त्यावर गतिरोधक विकसित करण्यास विसर पडला आहे. तत्काळ भराव रस्त्यावर चार ठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पुणे विभागीय आयुक्त, पुणे जिल्हाधिकारी, मुख्याध्याकारी यांना निवेदन देऊन केली मागणी केली आहे.

निगडीतील मेट्रोच्या कामात जलवाहिनी फुटली; लाखो लिटर पाण्याची नासाडी

पिंपरी । प्रतिनिधी

महामेट्रोकडून निगडी ते पिंपरी या मार्गावरील मेट्रो मार्गिकेचे काम सुरू आहे. काम करताना निगडी येथील टिळक चौकातील बस थांबा येथील पिंपरी-चिंचवड महापालिकेची जलवाहिनी फुटली. त्यामुळे लाखो लिटर पाणी वाया गेले. ती घटना बुधवारी (दि.११) सायंकाळी घडली. राज्यातील दुष्काळ परिस्थितीत अशा प्रकारे पिण्याचे पाणी वाया गेल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केले जात आहे. महामेट्रोकडून स्टेशनच्या पिलरसाठी खोदकाम सुरू आहे. जेसीबीद्वारे खोदकाम सुरू असताना अचानक जलवाहिनी फुटली. त्यात चौकात रस्त्यावर पाणीच पाणी झाले. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडली. त्या पाण्यातून नागरिकांना ये-जा करावी लागली. त्याचा नागरिकांसह प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. त्यात लाखो लिटर पाणी वाया गेले.

महामेट्रोच्या ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडली आहे. काम करताना योग्य ती काळजी न घेतल्यामुळे पाण्याची नाहक नासाडी झाली आहे. या पूर्वी चार ते पाच वेळा जलाहिनी फुटण्याचे प्रकार घडले आहेत. त्यासंदर्भात महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने महामेट्रोला नोटीसही बजावली आहे. मात्र, मेट्रोच्या कामात सुधारणा झालेली नसल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. ही बाब महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागास समजताच त्यांनी त्या वाहिनीतून पाणीपुरवठा बंद केला. त्यानंतर दुरूस्ती काम हाती घेण्यात आले. ते काम दुसर्या दिवशी गुरूवारी (दि.१२) सकाळी पूर्ण झाले.

माजी मुख्यमंत्री, पद्मभूषण, दिवंगत वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने अभिवादन

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पद्मभूषण, दिवंगत वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त सांगवी येथील त्यांच्या पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, ह प्रभाग अध्यक्षा तृप्ती कांबळे,उपायुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी संतोष कोराड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागातील कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



दिवंगत वसंतदादा पाटील यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात राज्याच्या विकासासाठी आणि सहकार चळवळीच्या विस्तारासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या नेतृत्वातून महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासाला दिशा मिळाली. विशेषतः सहकार, शिक्षण आणि कृषी क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा ठसा आजही कायम आहे.

मोशी डेपो दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मोफत सदनिका; आठ कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून ८ जुलै २०२६ ला झालेल्या दुर्घटनेत ९ कर्मचार्यांचा मृत्यू झाला. त्या कर्मचार्यांच्या कुटुंबीयांना पिंपरी येथील यशवंतनगरमधील एसआरए प्रकल्पांतर्गत सदनिकांचे मोफत वाटप करण्यात येणार आहेत. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित विभागास आदेश दिले आहेत.

पाच नोव्हेंबर २०२६ च्या प्रस्तावानुसार, एकूण ९ पैकी ८ मृत कर्मचार्यांच्या कायदेशीर वारसांना मोफत सदनिकांचे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये राहुल गायकवाड यांच्या पत्नी अश्विनी गायकवाड, महेश कुंभार यांच्या पत्नी शिवुबाई कुंभार, अक्षय सावंत यांच्या पत्नी हर्षदा बने, वामन कसबे यांच्या पत्नी सुनीता कसबे, सनी माने यांच्या पत्नी कांचन माने, सुनील कोरके यांच्या पत्नी पल्लवी कोरके, भावेश वाणी यांच्या पत्नी मोहिनी वाणी, तर रणजित पाटील यांच्या आई छाया जयवंत पाटील यांचा समावेश आहे. दुर्घटनेतील मृत नागेश गायकवाड यांच्या कायदेशीर वारसांच्या कागदपत्रांची पूर्तता अद्याप झालेली नाही. संबंधितांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांना सदनिका दिली जाणार आहे. मोशी डेपो दुर्घटनेतील मृत कर्मचार्यांच्या वारसांना मोफत सदनिका देण्याबाबत महापालिका सभेने २ सप्टेंबर २०२६ रोजीच्या ठरावानुसार मान्यता दिली.

त्यानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाने मोफत सदनिका देण्याबाबत कार्यवाही सुरू केली होती. त्यानुसार यशवंतनगरमधील एसआरए प्रकल्पात या आठ सदनिका उपलब्ध करून देण्याबाबतचा आदेश आयुक्तांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दुर्घटनेत कुटुंबातील कर्त्या व्यक्तीला गमावलेल्या कुटुंबांना निवार्याचा कायमस्वरूपी आधार मिळणार आहे. दरम्यान, मृत झालेल्या कर्मचार्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे आर्थिक साह्य देण्यात आले आहे. मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचार्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखाची महापालिका प्रशासनाला पूर्ण जाणीव आहे. त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीसोबतच हक्काचा निवारा उपलब्ध करून देण्याबाबत महापालिका संवेदनशील आहे. त्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

कासारवाडीतील डॉ. आंबेडकर जलतरण तलावात चोरी; शॉवर, नळांसह लाखोचे साहित्य लंपास

पिंपळे गुरव । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कासारवाडी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावात चोरट्यांनी डल्ला मारत मोठ्या प्रमाणात साहित्य लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. सुरक्षा पत्र्याची भिंत कापून चोरट्यांनी तलाव परिसरात प्रवेश केला. सीसीटीव्ही कॅमेरा, इलेक्ट्रिक साहित्य, शॉवर, नळांसह विविध साहित्य चोरीला गेले आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणी तीनही पाळ्यांमध्ये सुरक्षारक्षक तैनात असतानाही ९ नोव्हेंबर रोजी झालेल्या चोरीचा प्रकार तब्बल तीन दिवसांनंतर म्हणजेच १२ नोव्हेंबर रोजी उघडकीस आला. त्यामुळे जलतरण तलावाच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी जलतरण तलावाच्या बाजूला लावलेल्या सुरक्षा पत्र्याच्या भिंतीचा पत्रा कापून आत प्रवेश केला. त्यानंतर जलतरण तलावातील विविध साहित्य चोरून नेले. येत्या दहा दिवसांत हा जलतरण तलाव नागरिकांसाठी सुरू करण्याचे नियोजन होते. त्यासाठी परिसराची पाहणी करण्यासाठी जलतरण तलावाचे ठेकेदार फडतरे गेले असता त्यांना साहित्य चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. यानंतर त्यांनी याची माहिती महापालिका प्रशासनाला दिली.

या चोरीमध्ये एक सीसीटीव्ही कॅमेरा, दोन इलेक्ट्रिक वायर, एक एमसीबी, दोन हॅलोजन दिवे तसेच पुरुष आणि महिला स्वच्छतागृहांमधील शॉवर व नळ मोठ्या प्रमाणात चोरीला गेले आहेत. पुरुषांच्या बाथरूममधील ११ शॉवर आणि १३ नळ, तर महिलांच्या बाथरूममधील आठ शॉवर आणि १४ नळ चोरट्यांनी लंपास केले. याशिवाय शेजारील पाण्याच्या टाकीवरील दोन बाथरूममधील नळ, अतिक्रमण विभागाने ठेवलेल्या चार लोखंडी प्रेम तसेच शेजारील क्रिकेट



अकॅडमीमधील दोन क्रिकेट बॅटही चोरीला गेल्या आहेत.

चौकशीची मागणी

९ नोव्हेंबर रोजी चोरी झाली असताना तिचा उलगडा १२ नोव्हेंबर रोजी झाला. त्यामुळे सुरक्षारक्षकांच्या कामकाजाबरोबरच सुरक्षा यंत्रणेच्या देखरेखीबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत होती का?, सुरक्षारक्षकांनी नियमित गस्त घातली होती का? आणि चोरीची माहिती वरिष्ठांना वेळेत देण्यात आली होती का?, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

तीन पाळ्यांत सुरक्षारक्षक; तरी चोरी कशी?

जलतरण तलावाच्या ठिकाणी तीनही पाळ्यांमध्ये सुरक्षारक्षक काम करत असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, ९ नोव्हेंबरच्या हजेरी मस्टरवर संबंधित सुरक्षारक्षकाची स्वाक्षरी असल्याचेही निदर्शनास आले आहे. असे असताना चोरट्यांनी सुरक्षा पत्र्याचा भाग कापून आत प्रवेश केला आणि मोठ्या प्रमाणात साहित्य लंपास केले. मात्र, या प्रकाराची माहिती तत्काळ का मिळाली नाही?, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

जलतरण तलाव सुरू होण्याआधीच साहित्य चोरीला

सदर जलतरण तलाव ठेकेदारांना भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी देण्यात आला आहे. येत्या दहा दिवसांत तलाव सुरू करण्याच्यादृष्टीने तयारी सुरू होती. मात्र, सुरू होण्यापूर्वीच आवश्यक साहित्य चोरीला गेल्याने तलाव सुरू करण्याच्या नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. सार्वजनिक वापरासाठी असलेल्या महापालिकेच्या मालमत्तेची सुरक्षा करण्यासाठी सुरक्षारक्षक तैनात असतानाही चोरीची घटना घडल्याने प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्रशासन जबाबदारी निश्चित करणार का?

सुरक्षा पत्र्याची भिंत कापून चोरट्यांनी प्रवेश करणे, चोरीची माहिती तीन दिवसांनंतर समोर येणे, या सर्व बाबींची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. चोरीला गेलेल्या साहित्यांचा शोध घेऊन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. तसेच, भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. आता या प्रकरणी महापालिका प्रशासन काय कारवाई करणार, याकडे लक्ष लागले आहे.

या घटनेची माहिती मिळताच संबंधित ठिकाणी पर्यवेक्षकांना पाठविण्यात आले आहे. तसेच. या प्रकरणी पोलिसांकडेतक्रार करण्यात येणार आहे. सीसीटीव्ही यंत्रणा, सुरक्षा व्यवस्था, सुरक्षा रक्षक विभागाला आवश्यक ती कारवाई करण्यासाठी पत्र देण्यात येणार आहे. या प्रकरणाची दखल घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल.

पंकज पाटील, उपायुक्त, क्रीडा विभाग, महापालिका

कासरवाडी परिसरातील सीतांगण उद्यान, पाण्याची टाकी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावासह दापोडी-फुगेवाडी प्रभागातील महापालिकेच्या ठिकाणी रात्रीच्यावेळी सुरक्षारक्षकांची नेमणूक नसते. त्यामुळे अशा चोरीच्या घटना घडत आहेत. रात्रीच्या पाळीसाठी सुरक्षारक्षक असणे आवश्यक आहे.

प्रतीक्षा जवळकर, नगरसेविका